| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ४१ वा | सोमवार, दिनांक २७ एप्रिल २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.
RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## लातुरात गो सन्मान दिंडी; गोसंरक्षणासाठी ठोस कारवाईची मागणी

**लातूर/प्रतिनिधी :** गोसंरक्षण, गोसंवर्धन आणि गोसन्मानाचा जाज्वल्य संदेश देणारी गो सन्मान अभियान अंतर्गत भव्य दिंडी यात्रा सोमवारी लातूरमध्ये अभूतपूर्व उत्साहात आणि मोठ्या जनसमुदायाच्या उपस्थितीत संपन्न झाली. 'माँ पुकार रही है' या भावनिक संदेशाने प्रेरित होऊन हजारो नागरिकांनी या आंदोलनात सहभाग नोंदवला.

सोमवार, दि. २७/०४/२०२६ रोजी सकाळी ९ वाजता श्री हनुमान चौक, लातूर येथून दिंडी यात्रेला प्रारंभ झाला. ही दिंडी तहसील कार्यालय, लातूर येथे पोहोचून संपन्न झाली. दिंडीत सुमारे २०० गोवंश सहभागी झाले होते. वारकरी संप्रदायातील भाविक, श्री राम-लक्ष्मण-सीता विराजमान असलेला आकर्षक रथ तसेच गोमातेचा विशेष रथ यामुळे यात्रेचे स्वरूप अधिक भव्य आणि लक्षवेधी झाले.






या दिंडीत हजारो गोप्रेमी, गोसेवक, गोरक्षक, साधू-संत, विविध राजकीय व सामाजिक नेते तसेच हिंदुत्ववादी व हिंदू रक्षक कार्यकर्त्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा द्या, गोवंश हत्या बंदी कायद्याची सक्तीने अंमलबजावणी करा, गोहत्या, गोतस्करी व कत्तल पूर्णपणे बंद करण्यात यावी अशा ठोस व तीव्र मागण्यांसह आंदोलनकर्त्यांनी शासनाचे लक्ष वेधले.

विशेष म्हणजे, गेल्या साठ वर्षांपासून सुरू असलेल्या गोसंरक्षणाच्या आंदोलनाचा हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. सोमवारी देशभरातील ५००० पेक्षा अधिक तहसील कार्यालयांवर एकाच वेळी अशाच प्रकारे निवेदने देण्यात आली. गोरक्षणासाठी तातडीने ठोस व प्रभावी पावले उचलावीत, या मागणीसाठी लातूर तहसील कार्यालयातही अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनात सरकारने गोहत्या बंदी कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करावी, गोतस्करी व अवैध कत्तल रोखण्यासाठी कडक उपाययोजना कराव्यात, तसेच गायला राष्ट्रमातेचा दर्जा देण्याचा निर्णय घ्यावा, अशा मागण्या करण्यात आल्या. यासोबतच गोसंवर्धन, गोशाळांना आर्थिक सहाय्य आणि गोमातेच्या संरक्षणासाठी दीर्घकालीन धोरण आखण्याचीही मागणी करण्यात आली.

मार्गातील विविध ठिकाणी नागरिकांनी दिंडीचे स्वागत करत या आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या दिंडी यात्रेमुळे केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक पातळीवरही जनजागृती घडून आली असून, गोसंरक्षणासाठी एक व्यापक चळवळ उभी राहत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## पाकिस्तान मध्यस्थ बनण्याच्या लायक नाही : इराणी खासदार

### ते अमेरिकेच्या बाजूने झुकलेले, ट्रम्प आणि अमेरिकेविरुद्ध काही बोलू शकत नाहीत

**वॉशिंग्टन डीसी/तेहरान/वृत्तसंस्था :** मध्यपूर्वेत सुरू असलेले युद्ध संपवण्यासाठी इराण आणि अमेरिकेदरम्यानच्या चर्चेत अद्याप कोणतीही ठोस सहमती झालेली नाही. याच दरम्यान इराणच्या एका नेत्याने पाकिस्तानच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

इराणच्या संसदेच्या राष्ट्रीय सुरक्षा आणि परराष्ट्र धोरण समितीचे प्रवक्ते इब्राहिम रेजई म्हणाले की, पाकिस्तान मित्र नक्कीच आहे, पण तो चर्चेत योग्य मध्यस्थ होऊ शकत नाही.

रेजई म्हणाले की, पाकिस्तान अनेकदा डोनाल्ड ट्रम्प आणि अमेरिकेच्या हितांचा विचार करतो आणि त्यांच्या विरोधात काहीही बोलत नाही. त्यामुळे त्याला निष्पक्ष मानले जाऊ शकत नाही. ते म्हणाले की, खरा मध्यस्थ तोच असतो जो दोन्ही पक्षांमध्ये निष्पक्ष राहतो, नेहमी एकाच बाजूने झुकलेला नसतो.



त्यांचे हे विधान अशा वेळी आले आहे, जेव्हा इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी २४ तासांत २ वेळा पाकिस्तानचा दौरा केला.

ट्रम्प म्हणाले - इराणकडे फार कमी वेळ उरला आहे



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रविवारी इराणला इशारा दिला. ते म्हणाले की, युद्ध संपवण्यासाठी युद्धविरामावर सहमत होण्यासाठी त्याच्याकडे फक्त तीन दिवस आहेत, अन्यथा त्यांच्या तेल पाइपलाइनमध्ये स्फोट होईल.

फॉक्स न्यूजला दिलेल्या मुलाखतीत ट्रम्प म्हणाले की, जर इराण तेल निर्यात करू शकला नाही, तर पाइपलाइनमध्ये दाब वाढेल. असे यासाठी होईल कारण तेल जहाजांमध्ये किंवा साठवणुकीच्या टाक्यांमध्ये पाठवण्याचा मार्ग बंद आहे आणि त्यावर नाकेबंदी आहे.

त्यांनी दावा केला की, जेव्हा तेलाचा प्रवाह अचानक थांबवावा लागतो, तेव्हा पाइपलाइनच्या आत दाब निर्माण होतो आणि तांत्रिक व नैसर्गिक कारणांमुळे ती फुटू शकते. ट्रम्प यांच्या मते, जर असे झाले तर पाइपलाइनला पूर्वीच्या स्थितीत पुन्हा बनवणे जवळजवळ अशक्य होईल आणि तिची क्षमता देखील खूप कमी होईल.

## पाणीपुरीतून विषबाधा; ७ वर्षांच्या मुलाचा मृत्यू, ६० अत्यवस्थ

**रांची/वृत्तसंस्था :** झारखंडमधील बाजो गावामध्ये पाणीपुरी खाल्ल्याने विषबाधा झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेत एका सात वर्षीय मुलाचा मृत्यू झाला असून, सुमारे ६० जणांची प्रकृती अत्यवस्थ आहे. यातील २० जणांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. उन्हाळ्याच्या दिवसात बाहेरचे खाताना केलेली एक चूक जीवावर बेतू शकते, हे या घटनेमुळे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.झारखंडमधील गिरिडीह जिल्ह्यातील बाजो गावात एका पाणीपुरी विक्रेत्याकडून अनेक मुलांनी पाणीपुरी खाल्ली. काही तासांतच या मुलांना त्रास होऊ लागला. त्यांच्यावर सुरुवातीला स्थानिक उपचार करण्यात आले. मात्र, प्रकृती खालावल्याने त्यांना तातडीने सदर रुग्णालय आणि जवळच्या आरोग्य केंद्रात हलवण्यात आले. दुर्दैवाने, उपचारादरम्यान ७ वर्षाच्या रंजन कुमार या मुलाचा मृत्यू झाला.

गिरीडीहचे उपायुक्त रामनिवास यादव यांनी या घटनेला दुजोरा देताना सांगितले की, पाणीपुरी खाल्याने एका बालकाचा मृत्यू झाला असून इतरांवर उपचार सुरू आहेत. उन्हाळ्यामुळे आधीच अतिसाराचे रुग्ण वाढत असताना या घटनेने गावात भीती पसरली आहे. प्राथमिक अंदाजानुसार, कित्येक दिवस साठवून ठेवलेले शिळे पदार्थ या घटनेला कारणीभूत असावेत.

पाणीपुरीसाठी वापरले जाणारे पाणी आणि इतर साहित्य फ्रिजशिवाय अनेक दिवस ठेवले गेले असावे. यामुळे त्यात बॅक्टेरिया (जीवाणू) तयार झाले असावेत, असा अधिकाऱ्यांचा अंदाज आहे. सध्या पाण्याचे नमुने आणि अन्नाचे अवशेष तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत.

### प्रभात किरणे

खोट्याला भाव,
करती त्याची पूजा
गावो गावी माजली
तयाची पीक विवेक
टाकला गहाण त्व
चरणी कळता सत्य,
लपवून फिरे मुख
-इंजि. नागनाथ कलवले लातूर
९१-९७६४७ ८८२८८

## बाजार समितीच्यावतीने माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने शनिवारी आदरणीय साहेब यांची भेट घेऊन त्यांचा शाल श्रीफळ देऊन बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे व संचालक मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला

यावेळी बाजार समितीचे संचालक अनंत पाटील अँड लक्ष्मण पाटील तुकाराम गोडसे आनंद पवार, युवराज जाधव, श्रीनिवास शेळके, सुभाष घोडके अनिल पाटील, शिवाजी देशमुख, प्रा. डॉ बालाजी वाघमारे सुधीर गोजमगुंडे, प्रा. सचिन सूर्यवंशी बालासाहेब बिदादा सुरेखा पाटील लतिका देशमुख शिवाजी कांबळे प्रभारी सचिव अरविंद पाटील सहाय्यक सचिव सतीश भोसले उपस्थित होते.

## श्री केशवराज विद्यालयाचे ३७ विद्यार्थी 'NMMS' शिष्यवृत्तीस ठरले पात्र

### जिल्ह्यातून प्रथम चार विद्यार्थी श्री केशवराज विद्यालयाचे

**लातूर/प्रतिनिधी :** छचचड अर्थात आर्थिक दुर्बल घटक योजना परीक्षा २०२५ - २६ चा निकाल जाहीर झाला असून यात येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयातील तब्बल ३७ विद्यार्थी छचचड शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.

विशेष म्हणजे लातूर जिल्ह्यातून पहिले चारही विद्यार्थी याही वर्षी श्री श्री केशवराज विद्यालयातील आहेत. शाळेतून आणि जिल्ह्यातून प्रथम क्रमांक चि. अखिलेश अभयकुमार कुलकर्णी याने प्राप्त केला आहे.

तर द्वितीय क्रमांक ची. दिग्विजय ढगे या विद्यार्थ्याने मिळवला आहे. तृतीय क्रमांकावर कु. प्रणवी मुळे आणि चौथ्या क्रमांकावर ची. साईराज मोरे हे विद्यार्थी आहेत.

छचचड शिष्यवृत्तीस पात्र ठरलेल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.श्री सुरेंद्र आलुरकर, कार्यवाह डॉ.श्री हेमंत वैद्य, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री केशवराज शैक्षणिक संकुलचे पालक श्री राम कुलकर्णी, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य श्री प्रवीण सरदेशमुख, श्री संजय गुरव,स्थानिक समन्वय समिती कार्यवाह श्री शैलेश कुलकर्णी, स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष श्री धनंजय तुंगीकर,शालेय समिती अध्यक्ष श्री गंगाधर खेडकर,शाळेचे मुख्याध्यापक श्री बालासाहेब केंद्रे, उपमुख्याध्यापक श्री महेश कस्तुरे, पर्यवेक्षिका श्रीमती राजश्री कुलकर्णी, श्रीमती इंदू ठाकूर, श्रीमती अंजली निर्मळे, श्री धनंजय कुलकर्णी, श्री राम जोशी, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



उष्णतेचा पारा
४५ अंश पार,
काळजी घ्या...

### चिमटा दयाचा



नदीत पाणी असून
लातूरकर तहानलेले !
नियोजन बिघडले
दहा दिवसाला पाणी
मिळू लागले !!

## उन्हाळ्यातील वाढत्या तापमानात आरोग्याची काळजी घेण्याचे जिल्हा प्रशासनातर्फे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** सध्या वातावरणातील बदलांमुळे तापमान सतत वाढत असून हवामान खात्याच्या अंदाजानुसार मार्च महिन्यापासूनच राज्याच्या अनेक भागांत कडक ऊन जाणवू लागले आहे. साधारण एप्रिल आणि मे महिन्यांत सन बर्न, हिट क्रॅम्प्स (स्नायूंना गोळे येणे), हिट एक्झॉर्शन (प्रचंड थकवा) आणि हिट स्ट्रोक (उष्माघात) यांसारख्या उष्णताविकारांचा प्रादुर्भाव होतो. त्यामुळे नागरिकांनी आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

उन्हात कष्टाची कामे करणारे मजूर, वृद्ध, लहान मुले, गरोदर महिला, स्थूल व्यक्ती, पुरेशी झोप न झालेले लोक तसेच मधुमेह, हृदयविकार आणि व्यसन असणाऱ्या व्यक्तींना उष्माघाताचा अधिक धोका असतो. याशिवाय घट्ट कपडे घालणारे नागरिक आणि कारखान्यात बॉयलरजवळ काम करणाऱ्या कामगारांनीही उष्णतेच्या लाटेत विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

उष्णतेमुळे होणाऱ्या त्रासाची लक्षणे सौम्य किंवा गंभीर स्वरूपाची असू शकतात. सौम्य त्रासात थकवा, ताप, शरीरावर पुरळ उमटणे, चक्कर येणे आणि हाता-पायांना गोळे येणे अशी लक्षणे दिसतात. मात्र, गंभीर स्थितीत त्वचा गरम व कोरडी पडणे, तीव्र डोकेदुखी, रक्तदाब वाढणे, नाडीचे ठोके वेगात पडणे, मानसिक अस्वस्थता आणि बेशुद्धावस्था येऊन मृत्यू ओढवण्याची भीती असते.

**उष्णतेच्या लाटेमध्ये काय करावे**

प्रतिबंधात्मक उपाय म्हणून नागरिकांनी पुरेसे पाणी प्यावे, प्रवासात पाणी सोबत ठेवावे आणि हलक्या वजनाचे, फिकट रंगाचे सैल सुती कपडे वापरावेत. उन्हात बाहेर पडताना चष्मा, छत्री, टोपी व पादत्राणांचा वापर करावा आणि ओआरएस, लिंबू सरबत यांसारख्या पेयांचे सेवन करावे.

**काय करू नये**

कडक उन्हात कष्टाची कामे करणे, दुपारच्या वेळी घराबाहेर पडणे, मद्यपान, चहा-कॉफी व शीतपेयांचे अतिसेवन करणे टाळावे. तसेच लहान मुलांना बंद वाहनात ठेवू नये आणि चरबीयुक्त व शिळे अन्न खाणे टाळावे.

उष्माघाताचा त्रास झाल्यास रुग्णाला त्वरित वातानुकूलित किंवा हवेशीर खोलीत हलवून त्याचे शारीरिक तापमान कमी करण्यासाठी थंड पाण्याने अंघोळ घालावी किंवा कपाळावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवाव्यात. प्रकृती बिघडल्यास तत्काळ जवळच्या आरोग्य केंद्रात उपचार घ्यावेत. वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील ग्रामीण आरोग्य यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे.



**उष्माघात नियंत्रणासाठी विविध उपाययोजना कार्यान्वित**

हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार तापमानाचा पारा वाढत असून आगामी काळात उष्मतेची लाट येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणा सज्ज केली आहे. तापमानातील वाढ लक्षात घेता, १ मार्चपासूनच सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि शासकीय दवाखान्यांमध्ये स्वतंत्र 'उष्माघात कक्ष' स्थापन करण्यात आले असून, या कक्षांमध्ये रुग्णांसाठी आरक्षित खाटा, मुबलक औषधसाठा, पंखे, कुलर आणि पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

उष्मतेच्या लाटेमुळे होणारे सन बर्न, हिट क्रॅम्प्स आणि उष्माघातासारखे विकार रोखण्यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत जनजागृती करण्यात येत आहे. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले असून रुग्णवाहिका देखील सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. उष्माघाताची कोणतीही लक्षणे जाणवल्यास नागरिकांनी तातडीने जवळच्या शासकीय रुग्णालयात उपचार घ्यावेत आणि प्रशासनाने दिलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे पालन करून स्वतःचे संरक्षण करावे, असे आवाहन आरोग्य विभागाद्वारे करण्यात आले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## देशात राहणाऱ्या देशविरोधकांचा शोध

गेल्या काही दिवसांत ईशान्य भारतातील मणिपूर राज्य पुन्हा एकदा अस्थिरतेच्या गर्तेत ढकलले जात असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसू लागले आहे. देशाच्या मुख्य प्रवाहातील चर्चांमध्ये याबाबत फारशी चर्चा होत नसली तरी त्यामुळे परिस्थितीचे गांभीर्य कमी होत नाही. ईशान्येकडील या राज्यात गेल्या काही वर्षांत सामाजिक तणावाची जी पेरणी झाली, तिचे परिणाम आता अधिक उग्र स्वरूपात समोर येत आहेत. मैतेई, कुकी आणि नागा या प्रमुख समुदायांमधील अविश्वास आणि संघर्ष ही नवीन बाब नाही; मात्र अलीकडील घटनांनी या तणावाला आणखी धोकादायक वळण दिले आहे. सुरुवातीला मैतेई आणि कुकी समुदायांमध्ये केंद्रित असलेला संघर्ष आता नागा आणि कुकी समुदायांपर्यंत पोहोचला आहे. म्हणजेच जाणार्या दिवसागणिक संघर्षाची व्याप्ती वाढत असून, राज्यातील सामाजिक संतुलन ढासळण्याच्या मार्गावर आहे. मणिपूरमध्ये काही दिवसांपूर्वी झालेल्या बॉम्बस्फोटात दोन निष्पाप मुलांचा मृत्यू झाला आणि त्यानंतर परिस्थिती अधिकच चिघळली. याच्या निषेधार्थ संचारबंदी लागू असतानाही हजारो लोक मशाल मोर्चे काढत रस्त्यावर उतरले. ठिकठिकाणी हिंसाचाराच्या घटना घडत असून सुरक्षा यंत्रणा या सर्वांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यात अपयशी ठरत असल्याचे दिसते. कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेली यंत्रणा निष्प्रभ झाल्याचा हा स्पष्ट संकेत आहे. अशा परिस्थितीत सामान्य नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढणे अपरिहार्य ठरते. १८ एप्रिल रोजी दोन प्रवाशांची गोळ्या घालून हत्या झाल्याने येथील वातावरण अधिक स्फोटक बनले. या घटनेच्या निषेधार्थ नागा समुदायाने बंद पुकारला, तर कुकी समुदाय त्याच्या विरोधात उभा राहिला. परिणामी, दोन्ही गटांमध्ये हिंसक चकमकी, दगडफेक आणि जाळपोळ घडली. याचदरम्यान मैतेई समुदायातील लोकांनी मुख्यमंत्री युमनाम खेमचंद सिंह यांच्या कार्यक्रमस्थळी घुसखोरी केली. त्यांच्यावर नियंत्रण मिळवताना पोलिसांनी गोळीबार केल्याने नवा संघर्ष उभा राहिला. या सगळ्या घडामोडींमध्ये एक महत्त्वाचा बदल दिसून येत आहे, तो म्हणजे मैतेई समुदायाचा सरकारवरील विश्वास डळमळीत होऊ लागला आहे. सुरुवातीला राज्य सरकारच्या मागे ठामपणे उभा असलेला हा बहुसंख्य समुदाय आता जाहीरपणाने नाराजी व्यक्त करू लागला आहे. कायदा-सुव्यवस्थेच्या उपाययोजनांना खुलेआम आव्हान देणे, सुरक्षा दलांवर आरोप करणे आणि प्रशासनाच्या भूमिकेबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित करणे ही या बदलाची लक्षणे आहेत. ही स्थिती प्रशासनासाठी आव्हानात्मक ठरणारी आहे. मणिपूरचे भौगोलिक स्थान लक्षात घेतले तर ते म्यानमारच्या सीमेला लागून असल्याने हा प्रदेश आंतरराष्ट्रीय हालचालींसाठी संवेदनशील मानला जातो. अशा भागात अंतर्गत अस्थिरतेमुळे केवळ स्थानिक कायदा-सुव्यवस्था नव्हे, तर देशाच्या व्यापक सुरक्षा व्यवस्थेलाही धोका निर्माण होतो. याशिवाय, ईशान्य भारतातील राज्ये परस्परांशी सांस्कृतिक, सामाजिक आणि जातीय धाग्यांनी जोडलेली आहेत. एका राज्यात निर्माण झालेला तणाव सहजपणे शेजारील राज्यांत पसरू शकतो. मणिपूरमध्ये मैतेई, कुकी आणि नागा समुदायांमध्ये निर्माण झालेला संघर्ष हा केवळ स्थानिक मर्यादेत राहील, असे मानणे अवास्तव ठरते. नागा आणि कुकी समुदायांचे अस्तित्व नागालँड, मिझोरम आणि आसामच्या काही भागांतही आहे. त्यामुळे मणिपूरमधील संघर्षाचा परिणाम या राज्यांतील सामाजिक समतोलावरही होऊ शकतो. त्यामुळे या परिस्थितीकडे दुर्लक्ष करणे म्हणजे समस्येला अधिक खोलवर जाण्याची मुभा देणे होय. मणिपूर हा केंद्र सरकारच्या 'ॲक्ट ईस्ट पॉलिसी'च्या दृष्टीने महत्त्वाचा दुवा मानला जातो. भारताचा व्यापार वाढवण्यासाठी या प्रदेशातील रस्ते, दळणवळण, सीमावर्ती व्यापारमार्ग महत्त्वाची भूमिका बजावतात. या भागात सतत तणाव आणि हिंसाचार सुरू राहिल्यास त्याचा परिणाम गुंतवणुकीवर आणि पर्यायाने विकासावर होतो. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारांनी या परिस्थितीकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेच्या समस्येच्या चौकटीत पाहणे पुरेसे ठरणार नाही. या संघर्षामागील सामाजिक, ऐतिहासिक आणि राजकीय कारणांचा सखोल अभ्यास करून दीर्घकालीन उपाययोजना आखणे गरजेचे आहे. विविध समुदायांमध्ये संवाद प्रस्थापित करणे, विश्वासतूट दूर करणे आणि न्याय्य व पारदर्शक प्रशासन उभे करणे, ही आवश्यक पावले उचलण्याबाबत सरकार कमी का पडत आहे? मणिपूर आज ज्या टप्प्यावर उभा आहे, तेथे ही समस्या केवळ कायदा-सुव्यवस्थेची राहिलेली नाही. ती ओळख, भूभाग, संसाधने आणि सत्तावाटप या मूलभूत प्रश्नांशी निगडित आहे. जोपर्यंत या प्रश्नांना न्याय्य आणि सर्वसमावेशक उत्तर मिळत नाही, तोपर्यंत मणिपूरमधील अस्थिरता संपण्याची शक्यता कमीच आहे. या अरिष्टातून बाहेर काढण्यासाठी आता केवळ वरवरच्या उपाययोजना करून चालणार नाही. सर्व समुदायांचा विश्वास संपादन करू शकेल अशी एक निष्पक्ष 'शांतता समिती' स्थापन करणे गरजेचे आहे. यामध्ये राजकीय नेत्यांऐवजी नागरी समाजातील प्रतिष्ठीत व्यक्ती आणि महिला नेत्यांचा सहभाग असायला हवा. डोंगराळ भागातील आदिवासींचे हक्क अबाधित राखतील व खोर्यातील जनतेची कोंडीही फोडतील, असे बदल जमिनीच्या कायद्यांमध्ये करणे आवश्यक आहे. यासाठी केंद्र सरकारने केवळ प्रेक्षकाची भूमिका न घेता निर्णायक हस्तक्षेप करणे काळाची गरज आहे. केंद्र सरकारने या बाबत कठोर निर्णय घेण्याची गरज आहे. मणिपुर अनेक दिवसापासुन अशांत आहे त्यामुळे परकिय शक्तीचा हात असल्याचा संशय आहे. भारतात राहुन भारताविरोधात काम करणारी मंडळीचा शोध घेणे काळाची गरज आहे. भारत गाफील राहील तर आगामी काळात मोठी किंमत मोजावी लागेल.

# धिरज देशमुख यांनी केले युवक काँग्रेस पदाधिकाऱ्यांचे कौतुक;

## गलथान कारभाराबाबत प्रशासनाला विचारला जाब



**लातूर/प्रतिनिधी :** मुरूड ग्रामीण रुग्णालयातील रुग्णवाहिका सेवेतील हलगर्जीपणाचा एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. करंट लागल्यामुळे गंभीर जखमी झालेल्या रुग्णाला पुढील उपचारासाठी लातूरकडे १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेतून हलविण्यात येत असताना काही अंतरावरच रुग्णवाहिकेचा एक महत्त्वाचा भाग अचानक गळून पडला. या प्रकारामुळे मोठा अनर्थ घडण्याची शक्यता निर्माण झाली होती.

या जीवघेण्या परिस्थितीत योगायोगाने घटनास्थळी उपस्थित असलेले युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष मुकेश सवासे, उपाध्यक्ष सुरज कांबळे व समाधान गायकवाड यांनी तत्परता दाखवत तात्काळ मदतीसाठी धाव घेतली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांनी वेळ न दवडता खासगी रुग्णवाहिका बोलावून घेतली आणि पत्रकार मनोज जोशी यांच्या सहकार्याने संबंधित रुग्णाला सुरक्षितपणे लातूरकडे रवाना केले.

या युवकांनी दाखवलेली संवेदनशीलता, जबाबदारी आणि माणुसकी ही कौतुकास्पद असल्याची भावना व्यक्त करत लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले. अशा प्रसंगी पुढाकार घेणारे युवक समाजासाठी प्रेरणादायी ठरतात, असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, या घटनेमुळे ग्रामीण भागातील रुग्णवाहिका सेवेच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रुग्णवाहिकेचा महत्त्वाचा भाग रस्त्यात गळून पडणे ही केवळ निष्काळजीपणाची बाब नसून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करणारी घटना आहे. जर या प्रकारामुळे अपघात झाला असता, तर त्याची जबाबदारी कोणाची, असा सवाल सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित प्रशासनाने तातडीने दखल घेऊन ग्रामीण भागातील रुग्णवाहिकांची सखोल तांत्रिक तपासणी करावी, दोषींवर कडक कारवाई करावी आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी मागणी धिरज विलासराव देशमुख यांनी केली आहे.

# ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला प्रारंभ

**लातूर/प्रतिनिधी :** भारताला हस्तलिखितांचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. पारंपारिक ज्ञान हे पिढीदर पिढी या हस्तलिखितांद्वारे प्रसारीत होत आलेले आहे. परंतू हे सर्व हस्तलिखिते जागोजागी विखुरलेल्या स्वरुपात आहेत. सदरील हस्तलिखिताचे ज्ञानभंडार एकत्र करुन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देता यावे या दृष्टीने भारत सरकारने ज्ञानभारतम् या प्रकल्पाची आखणी केली आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश भारतातील मौल्यवान हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार करणे हा आहे. भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ज्ञानभारतम् या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला दिनांक १६ मार्च २०२६ पासून प्रारंभ करण्यात आला आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था, संग्रहालये, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खाजगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

तसेच भारताच्या समृद्ध ज्ञानपरंपरेशी संबंधित हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह निर्माण करून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे. यामध्ये हस्तलिखितांची मालकी ही संबंधीत संस्था, ग्रंथालय अथवा खाजगी संग्राहक यांचीच राहणार आहे. परंतू कोणाला स्वखुशीने सदरील हस्तलिखिते शासनाकडे सुपूर्द करावायाची झाल्यास शासन ती स्विकारेल. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य सरकारची महत्त्वपूर्ण भूमिका असून राज्यातील विविध सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था, हस्तलिखित संग्रहालये तसेच विद्वान यांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्यात या प्रकल्पासाठी खालील संस्था क्लस्टर केंद्र व स्वतंत्र केंद्र म्हणून कार्यरत राहणार आहेत:

**क्लस्टर केंद्र- कवी कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर**

**क्लस्टर केंद्र- भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे**

**आनंद आश्रम संस्थान, पुणे - स्वतंत्र केंद्र**

**भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे- स्वतंत्र केंद्र**

महाराष्ट्र राज्यासाठी राज्य नोडल संस्था म्हणून पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली असून राज्य नोडल अधिकारी म्हणून श्री. सुजितकुमार उगले, संचालक, पुराभिलेख संचालनालय कार्य पाहणार आहेत. तर श्रीमती. अंजली ढमाळ, उपसंचालक, मराठी भाषा विकास संस्था, तथा अभिजात मराठी भाषा कक्षा, मराठी भाषा विभाग या सहनोडल अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत.

या सर्वेक्षणासाठी ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत ऋ्रूप इहरीरींरा हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले असून त्याद्वारे हस्तलिखितांचे क्षेत्रीय मूल्यांकन, पडताळणी व दस्तऐवजीकरणाची प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे.या मोहिमेच्या अनुषंगाने सर्व जिल्हाधिकारी यांना त्यांच्या जिल्ह्यात ज्ञानभारतम् प्रकल्पासाठी जिल्हा नोडल अधिकारी नियुक्त करणे, जिल्हास्तरीय समिती स्थापन करणे, तसेच मंदिरे, मठ, धार्मिक संस्था, विद्यापीठे, ग्रंथालये, शैक्षणिक संस्था व खाजगी संग्राहक यांना सर्वेक्षणात सहभागी करून घेणे याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

या सर्वेक्षण मोहिमेत शैक्षणिक संस्था, ग्रंथालये, संग्रहालये, संस्कृत पाठशाळा, धार्मिक संस्था, संशोधक, पारंपरिक पंडित, तसेच NCC, NSS स्वयंसेवक, विद्यार्थी व वारसा संवर्धन संस्था यांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे.

या निमित्ताने आवाहन करण्यात येते की, आपल्याकडे जर काही हस्तलिखिते उपलब्ध असतील तर त्याची माहिती ज्ञानभारतम् या मोबाईल ॲप वर अपलोड करावी व या राष्ट्र कार्यात सहभाग नोंदवावा.

## जागतिक हिवताप दिनानिमित्त महानगरपालिकेमार्फत

# जनजागृती व आरोग्य तपासणी शिबिर





**लातूर/प्रतिनिधी :** जागतिक हिवताप दिनानिमित्त लातूर शहर महानगरपालिका अंतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, तावरजा कॉलनी येथे जनजागृती व आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. याप्रसंगी नगरसेवक ॲड. किरण जाधव, सुरेखा ईगे,नसरीन शेख, मंगेश सोनकांबळे, सचिन गायकवाड उपस्थित होते.

ॲड.किरण जाधव यांनी लातूर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मलेरिया पूर्णपणे संपवण्याकरिता आरोग्य विभागातील आशा सेविकांपासून ते वैद्यकीय अधिकारी या सर्वांना मनापासून पूर्ण प्रयत्न करावे आणि लातूरकरांना मलेरिया पासून सुरक्षित ठेवावे, याविषयी सूचना दिल्या.

यावेळी सन २०२४ या वर्षामध्ये आजार प्रतिबंधात्मक उपाययोजनांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या वैद्यकीय अधिकारी डॉ. शर्वरी महाजन आणि लॅब टेक्निशियन श्रीमती. रेशमा डांगे यांचा सन्मान करण्यात आला. शहरासाठीचे आरोग्य निरीक्षक पार्श्र्वनाथ पाटील यांच्या आरोग्य सर्वे क्षणात्मक उत्कृष्ट कामगिरी करिता सत्कार करण्यात आला. तसेच डेंग्यू मलेरिया / प्रतिबंधाकरिता घरोघरी फिरून प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी करणाऱ्या आशा स्वयंसेविका यांचा देखील सत्कार करण्यात आला.

डॉ.शंकर भारती यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना जागतिक हिवताप दिन साजरे करण्यामागची पार्श्र्वभूमी आणि हिवतापाला दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजना का महत्त्वाच्या आहेत, याची माहिती दिली. यावेळी कार्यक्रमाकरिता आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी आणि भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ऋषिकेश खरोळकर यांनी केले.

## जाणून घ्या नाभीला तेल लावण्याचे फायदे; कोणते तेल सर्वोत्तम?

नाभीला तेल लावणे ही ''नाभी पुराण'' नावाची आयुर्वेदिक पद्धत आहे. यामुळे पचन सुधारते, त्वचा उजाळचे आणि तणाव कमी होतं असं म्हटलं जातं. नाभी पोटाच्या मध्यभागी असते, तिची त्वचा पातळ असते आणि त्यात अनेक लहान रक्तवाहिन्या असतात. आयुर्वेदानुसार, नाभी शरीराचे केंद्र असल्याने आणि अनेक नसांशी जोडलेली असल्याने, ती तेल शोषून घेते आणि त्वचा, पचन, हार्मोन्स आणि दृष्टी सुधारण्यास मदत करते. नाभीला तेल लावणे हा वैद्यकीय उपचार नसला तरी, ही एक पारंपारिक आणि आयुर्वेदिक पद्धत आहे. जी त्वचेला मॉइश्चरायझ करते आणि शांत करते. तसंच पचन आणि किरकोळ त्वचेच्या समस्या (जसे की फाटलेले ओठ, कोरडेपणा किंवा सौम्य जळजळ) दूर होण्यास मदत होते. झोपण्यापूर्वी नाभीला तेल लावणे योग्य आहे. असं नियमितपणे केल्यास, त्वचा आणि शरीर शांत होऊ होते.

IREMIA च्या संस्थापक आणि त्वचारोगतज्ञ प्रीती चड्ढा यांच्या मते, झोपण्यापूर्वी बदाम, नारळ किंवा मोहरीचं तेल नियमितपणे नाभीवर लावल्याने त्वचा आणि शरीराला आराम मिळतो. मात्र हे लक्षात ठेवणे गरजेचं आहे की हे कोणत्याही गंभीर आजारावर उपचार नाही...

एरंडेल तेल: एरंडेल तेल घट्ट असते आणि हळूहळू शोषले जाते. त्यामुळे कोरडेपणा किंवा पोटात हलका त्रास असलेल्यांसाठी ते फायदेशीर ठरते. पारंपारिकपणे, ते त्वचेला मऊ करण्यासाठी आणि सौम्य उबदारपणा देण्यासाठी वापरले जाते. रात्री तेलाचे काही थेंब लावल्याने नाभीभोवतालची त्वचा शांत होण्यास मदत होते. त्याचा मुख्य फायदा म्हणजे अंतर्गत स्वच्छता नव्हे तर ओलावा टिकवून ठेवणे. कोल्ड-प्रेस केलेले, हेक्सेन-मुक्त एरंडेल तेल सर्वोत्तम काम करते.

नारळ तेल: नारळ तेल बहुतेक त्वचेच्या प्रकारांना शोभते. त्यात नैसर्गिक फॅटी ॲसिड असतात जे त्वचेच्या अडथळ्याचे संरक्षण करण्यास मदत करतात. नाभीवर लावल्याने ते घट्ट कपडे किंवा घामामुळे होणारी कोरडेपणा आणि सौम्य जळजळ कमी करू शकते. त्याची हलकी पोत दैनंदिन वापरासाठी, विशेषत: गरम हवामानात, एक चांगला पर्याय आहे.

तीळ तेल: तीळ तेल त्याच्या तापमानवाढीच्या प्रभावासाठी ओळखले जाते. पारंपारिक पद्धतींमध्ये, ते सांधे आणि स्नायूंभोवती कडकपणा कमी करण्यास आणि रक्त परिसंचरण वाढविण्याशी संबंधित आहे. नाभीवर लावल्यास, ते पोटाच्या भागात आराम देऊ शकते, विशेषत हिवाळ्याच्या दिवसांत. तीळ तेल वापरण्यापूर्वी तेल थोडेसे गरम केल्याने आराम आणि शोषण सुधारते.

बदाम तेल: बदाम तेल हलके, सौम्य आणि व्हिटॅमिन ई ने समृद्ध आहे. ते संवेदनशील त्वचेसाठी आणि ज्यांना खाज सुटण्याची किंवा लालसरपणा होण्याची शक्यता असते त्यांच्यासाठी योग्य आहे. नाभीभोवती नियमित वापरल्याने त्वचा मऊ राहण्यास मदत होते आणि कालांतराने जुन्या स्ट्रेच मार्क्सचे स्वरूप सुधारू शकते.

मोहरीचे तेल: मोहरीचे तेल उबदारपणा निर्माण करते आणि त्वचेला रक्त प्रवाह वाढवते. काही लोक पोटात पेटके किंवा जडपणा येण्यासाठी ते वापरतात. मात्र, ते संवेदनशील त्वचेला त्रास देऊ शकते. यामुळे पॅच टेस्ट करणे आवश्यक आहे आणि ते नेहमी सौम्य तेलाने पातळ करून वापरावे. मोहरीचं तेल तुम्ही नियमित वापरणं टाळा हप्त्यातून तीन ते चार वेळा मोहरीचं तेल वापरणं योग्य आहे.

नाभीला तेल लावण्यापूर्वी हे लक्षात ठेवा: तेलापेक्षा त्वचा स्वच्छ करणे जास्त महत्त्वाचे आहे. घाम किंवा बॅक्टेरिया अडकू नयेत म्हणून तेल लावण्यापूर्वी नाभी नेहमी धुवा. तसंच तेल लावतांना काही थेंब घाला जास्त तेल लावू नका. जास्त तेलाचा अर्थ चांगले परिणाम मिळणे असं नाही. परिणाम व्यक्तीनुसार बदलतात आणि त्याचे फायदे बहुतेकदा त्वचेच्या आराम आणि विश्रांतीशी संबंधित असतात. जर कोणतीही जळजळ, खाज सुटणे किंवा पुरळ उद्भवली तर ताबडतोब वापर बंद करा.

## थंडीमुळे बीपी आणि ब्रेन स्ट्रोकच्या रुग्णांमध्ये वाढ; जाणून घ्या कारणे, लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपाय

आजकाल हवामानात अचानक होणारे बदल आणि लोकांच्या निष्काळजीपणामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. विशेषत: गेल्या आठवड्यापासून, ब्रेन हॅमरेज आणि स्ट्रोकच्या रुग्णांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे. वैद्यकीय तज्ञांचं म्हणणं आहे की, दरवर्षी हिवाळ्यात ब्रेन स्ट्रोकच्या रुग्णांमध्ये मोठी वाढ होते. यावर्षी इतर वर्षाच्या तुलनेत या रुग्णांच्या संख्येत २० ते ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. तज्ञांनी असा इशारा दिला आहे की, ज्या लोकांना आधीच हृदयरोग आहे त्यांचा धोका वाढू शकतो. कारण थंडीच्या काळात हृदयविकाराचा झटका आणि इतर हृदययासंबंधित इतर आजारांचा धोका देखील वाढतो.

थंडीच्या काळात स्ट्रोक आणि रक्तदाबाचे रुग्ण का वाढतात? तज्ञांच्या मते, हिवाळ्यात स्ट्रोकच्या रुग्णांमध्ये २०-३० टक्क्यांनी वाढ होते आणि रक्तस्त्राव होण्याचा धोका दुप्पट होऊ शकतो, विशेषत: वृद्धांमध्ये किंवा उच्च रक्तदाब असलेल्यांमध्ये. डॉक्टरांचं म्हणणं आहे की, जानेवारी आणि फेब्रुवारीमध्ये स्ट्रोकच्या सर्वाधिक रुग्णांची नोंद होते. या हंगामी वाढीमागे पाच मुख्य कारणे आहेत, ज्यात रक्तवाहिन्यांचे आकुंचन, ज्यामुळे उच्च रक्तदाब होतो; डिहायड्रेशन, ज्यामुळे रक्त जाड होते; हार्मोनल बदल, ज्यामुळे हृदयावर दबाव येतो; शारीरिक हालचाली कमी होतात आणि सकाळी ६ ते १० दरम्यान तापमानात घट होते. हे सर्व घटक थंडीच्या काळात ब्रेन स्ट्रोक आणि हृदयरोगांमध्ये वाढ होण्यास हातभार लावतात.

वैद्यकीय तज्ञ हिवाळ्याच्या काळात प्रतिबंधात्मक उपायांची शिफारस करतात, जसं की सुरळीत रक्तदाब राखणे, पुरेसे पाणी पिणे, नियमित व्यायाम करणे आणि डॉक्टरांनी लिहून दिलेल्या औषधांचे पालन करणे. तज्ञांचं म्हणणं आहे की, कमी तापमानामुळे अनेक शारीरिक बदल होतात ज्यामुळे स्ट्रोकचा धोका वाढतो. ते पुढे म्हणतात की ऋअडढ (चेहऱ्याचे लटकणे, हात कमकुवत होणे, बोलण्यात अडचण येणे, मदतीसाठी कॉल करण्याची वेळ) यासारख्या लक्षणांची लवकर ओळख झाल्यास रूग्णाचे बचाव करता येते.

उच्च रक्तदाबाची लक्षणे: डॉ. सौरभ सेठी यांच्या मते, उच्च रक्तदाबाची सहसा कोणतीही लक्षणे नसतात. तो वर्षानुवर्षे दुर्लक्षित राहू शकतो. खरं तर, जागतिक आरोग्य संघटनेचा अंदाज आहे की, उच्च रक्तदाब असलेल्या ४६ टक्के प्रौढांना हे माहितही नसते की ते उच्च रक्तदाबाचे शिकार झाले आहेत. जर तुमचा रक्तदाब खूप जास्त असेल, तर तुम्हाला खालील लक्षणे जाणवू शकतात.

मानसिक कार्यात बदल

छातीत दुखणे, चक्कर येणे, सूज (एडेमा), हृदय गती वाढ , नेहमीपेक्षा कमी लघवी होणे, झटके, तीव्र डोकेदुखी

स्ट्रोकची लक्षणे, जसे की अचानक चेहरा वाकणे, बोलण्यात अडचण येणे किंवा हात किंवा पायात अचानक कमजोरी येणे.

डोळ्यांत वेदना, दृष्टी कमी होणे किंवा अचानक अंधुक दिसणे यासारखे दृष्टीशी संबंधित बदल.

ब्रेन स्ट्रोकची सुरुवातीची लक्षणे कोणती? यूएस सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शनच्या मते, स्ट्रोकची समस्या अचानक उद्भवते. परंतु काही लक्षणे लवकर दिसून येतात. सुरुवातीच्या लक्षणांना लवकर लक्ष केंद्रीत केल्यास जीव वाचू शकतो.

तोंडाच्या एका बाजूला अचानक सुन्नपणा येणे.
एका किंवा दोन्ही हातांमध्ये अशक्तपणा किंवा सुन्नपणा
बोलण्यात किंवा समजण्यात अडचण येणे
सतत किंवा तीव्र डोकेदुखी
अचानक दृष्टी कमी होणे किंवा अंधुक दृष्टी येणे
चालताना तोल जाणे किंवा चक्कर येणे

BAED सूत्र वापरून स्ट्रोक कसा ओळखायचा

इ - चेहरा: त्या व्यक्तीचा चेहरा एका बाजूला झुकलेला आहे का?

अ- हात: तो दोन्ही हात वर करू शकत नाही का?

ए- भाषण: त्याचे बोलणे अस्पष्ट होत चालले आहे का?

ऊ- वेळ: जर तुम्हाला ही लक्षणे दिसली तर ताबडतोब रुग्णवाहिका बोलवा

## तुमच्या तणावाचा आतड्याच्या आरोग्यावर होतो परिणाम ?

आतड्याच्या आरोग्याला मेंदू कसा प्रभावित करू शकतो
जेव्हा तुम्हाला वाटते की तुम्ही तणावग्रस्त आहात, तेव्हा तुमच्या आतड्यांमधील अनुकूल जीवाणूंमध्ये सौम्यपणे बदल होऊ शकतो. हे अनुकूल जीवाणू तुम्हाला दीर्घकालीन आजारांपासून दूर ठेवण्यास साह्यभूत ठरतात. सेल मेटाबॉलिझममध्ये प्रकाशित झालेल्या एका नवीन अभ्यासानुसार, संशोधकांना असे आढळून आले, तणाव नसलेल्या उंदरांच्या तुलनेत दोन आठवड्यांपर्यंत तीव्र तणावाच्या संपर्कात असलेल्या उंदरांमध्ये आतड्यांचे रोगजनकांपासून ( pathogens) संरक्षण करणाऱ्या पेशींची पातळी कमी होते. या संशोधनामध्ये आतड्याच्या आरोग्याला मेंदू कसा प्रभावित करू शकतो हे सिद्ध झाले.
इरिटेबल बोवेल सिंड्रोमसारख्या आतड्याला प्रभावित करणाऱ्या (gastro-intestinal) परिस्थितीच्या वाढीला मानसिक तणाव कारणीभूत आहे; ज्यामुळे ओटीपोटात दुखणे आणि अतिसार, असा त्रास होतो. अभ्यासातील संशोधकांनी निदर्शनास आणले आहे की, तणाव बायोकेमिकल कॅस्केड (लळेलहशाळलरश्र लरीलरवश) कसा बंद करू शकतो; जो आतड्याच्या मायक्रोबायोमला (microbiome) पुन्हा आकार देतो. तुमच्या माहितीसाठी, बायोकेमिकल कॅस्केड ही रासायनिक अभिक्रियांची मालिका आहे; जी उत्तेजित झाल्यावर एखाद्या जैविक पेशीमध्ये उदभवते. तुमचे आतड्यांचे मायक्रोबायोम हे तुमच्या आतड्यांमध्ये राहणाऱ्या सूक्ष्म जंतूंची जैविक साखळी आहे.



चंदिगड येथील पीजीआयच्या गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी विभागाचे प्रमुख व माजी प्राध्यापक डॉ. राकेश कोचर यांनी द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना सांगितले, आपल्या आतड्यांमध्ये सूक्ष्म जीवांची सर्वांत जास्त संख्या असते आणि त्याच वेळी ते स्वायत्त मज्जासंस्थेशी (रींींपोळल पर्शीींीं ूीींशा) जोडलेले असतात; ज्यामध्ये मेंदूच्या बाहेर सर्वांत मोठे नसांचे जाळे असते. आतड्याच्या अस्तरांभोवती असलेले सूक्ष्म जीव, आतड्यांतील सूक्ष्म जीव, लठ्ठपणा, मधुमेह, दाह किंवा सूज निर्माण करणारे आतड्याचे रोग, फॅटी लिव्हर (त्रर्ीीं श्र्ळींशी), स्वयंप्रतिकार रोग (–ीींळार्ीपिश वळीशरीशी) आणि अगदी काही न्यूरोलॉजिकल रोगांसारख्या अनेक रोगांशी संबंधित आहे. मायक्रोबायोममधील बदलांसह आतड्यांतील अस्तर पेशींमध्ये होणारे बदल रोगाच्या स्थितीकडे नेणाऱ्या घटनांचे कॅस्केड तयार करतात.
आतड्यांमधील जीवाणूबाबत द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना मोहाली येथील फोर्टीस हॉस्पिटलच्या क्लिनिकल पोषण आणिव आहारशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ .सोनिया गांधी यांनी सांगितले, तणाव हे आतड्याच्या पोषक घटकांच्या शोषण्याच्या क्षमतेवर आणि संपूर्ण प्रणालीवर परिणाम करू शकतात. पचनाच्या विकारांव्यतिरिक्त, झोपेचा त्रास, थकवा व संसर्गाची शक्यता जास्त असू शकते.

## विक्रमी मतदान, कोणाला ?




९० लाख म्हणजे १२ टक्के मतदारांची नावे वगळली गेल्याने पहिल्या टप्प्यात केवळ ३.६१ कोटी मतदार उरले. त्यापैकी ३.३५ कोटी मतदान झाल्याने टक्केवारी ९२ टक्क्यांपर्यंत पोहचली. वाढलेली टक्केवारी सत्ताबदल घडवून आणते की, सत्ता कायम ठेवते हे पाहायचे. पश्चिम बंगालमध्ये गुरुवारी पहिल्या टप्प्यातील १५२ जागांसाठीचे मतदान पार पडले. यावेळी ९२ टक्क्यांच्या आसपास विक्रमी मतदान झाले. मतदार याद्यांच्या विशेष तीव्र पडताळणी मोहिमेत २७ लाखांहून अधिक मतदारांना वगळले असतानाही, इतक्या मोठ्या संख्येने मतदारांनी मतदानास पुढे यावे, हा लोकशाहीचा विजय म्हणावा लागेल. पहिल्या टप्प्यात १४७८ उमेदवारांचे भवितव्य ठरणार आहे, तर दुसरा टप्पा येत्या २९ तारखेला पार पाडणार आहे. विक्रमी मतदानानंतर तृणमूल आणि भाजप या दोन्ही पक्षांनी विजयाचा दावा केला असला तरी त्याचे स्पष्ट उत्तर ४ मे रोजी होणार्या मतमोजणीनंतरच मिळणार आहे.
पश्चिम बंगालमध्ये मतदारांमध्ये किती जागरूकता आहे, याचे विक्रमी मतदान हे उदाहरण आहे. कोणत्याही निवडणुकीत तेथे ७५ टक्के मतदान कमी समजले जाते. तेथे ९० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान म्हणजे राजकीय भूकंप ठरेल का आणि तो कोणाला धक्का देईल हा खरा प्रश्न आहे.
भाजपने तर पहिल्या टप्प्यातच १२५ जागा मिळतील असा दावा केला आहे. मात्र एवढ्या मोठ्या संख्येने आणि तेही निवडणूक आयोगाने राबवलेल्या मतदार याद्यांच्या पडताळणीने त्रस्त झालेल्या मतदारांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची सता टिकवण्याच्या दृष्टीने दिलेला तो कौल असण्याचीच अधिक शक्यता दिसते. २०२१ च्या निवडणुकीत ८० टक्क्यांपेक्षा थोडेसे अधिक मतदान झाले होते. तो विक्रम या निवडणुकीने मोडला. त्यावेळी भाजप ३ वरून ७७ जागांवर गेला, आता विधानसभेत काही चमत्कार घडेल आणि भाजपची सत्ता येईल ही शक्यता दुरापास्त वाटते. भाजपच्या जागा वाढतील मात्र सत्ता मिळेल, अशी शक्यता दिसत नाही. शिवाय मतदानाच्या आणखी एका टप्प्यात तृणमूल काँग्रेसला बरेच काही साध्य करता येण्यासारखे आहे.
दिदी विरुद्ध कोण?
खरे तर ही निवडणूक तृणमूल विरुद्ध भाजप अशीच झाली; मात्र एकेकाळी सत्तेत असणारे डावे कम्युनिस्ट पक्ष आणि १० वर्षे त्यांच्या सोबत असलेल्या काँग्रेसचा प्रभाव प्रचारात फारसा दिसला नाही. यावेळी युती तोडून काँग्रेसने २९३ जागा लढवल्या. आता तो पक्ष किती जागा मिळवणार हे पाहायचे. डाव्यांची अवस्थाही फारशी वेगळी नाही. सिंगूर नंदीग्रामनंतर गरिबांचा पक्ष ही डाव्यांची प्रतिमा संपुष्टात आली. ममता यांनी लक्ष्मीर भंडार, कन्याश्री यांसारख्या योजना आणून त्यांचा मतदार आपल्याकडे खेचला. भाजपनेही जनधन, उज्ज्वला यांसारख्या योजना आणून उरलेला मतदार पळवला. बुद्धदेव भट्टाचार्य यांच्यानंतर डाव्यांना चेहराच उरला नाही. महिला मतदार ही ममतांची ताकद राहिली आहे, भाजपने ऐन निवडणुकीत महिला आरक्षणाचे कार्ड खेळून पाहिले. त्याला ममतांनी कडाडून विरोध केला. आजही ममतांना टक्कर देणारा चेहरा भाजपमध्ये नाही. स्थानिक नेतृत्व नाही ही भाजपची पश्चिम बंगालमध्ये खरी अडचण आहे. मुख्यमंत्री कोण या प्रश्नाचे उत्तर त्यांच्याकडे नाही. प्रचारसभा गाजवण्यासाठी मोदी-शहा यांना वारंवार तेथे यावे लागते. तृणमूलमधून आलेल्या 'दलबदलू' नेत्यांना पक्षात घ्यावे लागल्याने भाजपमध्ये नाराजी आहेच. मतदानाच्या दिवशी भाजपच्या उमेदवाराच्या मोटारीवर दगडफेक, हाणामारी यांसारख्या हिंसक घटना घडूनही ६२ टक्क्यांपेक्षा अधिक मतदार दुपारपर्यंत मतदान करतात याचा अर्थ त्यांचा लोकशाही प्रक्रियेवरचा विश्वास अधिक आहे. ते घाबरून घरी बसत नाहीत. या निवडणुकीबद्दल महिला मतदारांचा उत्साह दिसून आला. ग्रामीण महिलांचा कौल यात निर्णायक ठरण्याची शक्यता अधिक दिसते. ममता बॅनर्जी यांच्या कारभारावर भाजप नेत्यांनी केलेली टीका, त्यांच्यावर केलेला अनुनयाचा आरोप याला मतदारांनी किती गांभीर्याने घेतले हे निकालातूनच स्पष्ट होईल. दिल्लीच्या सत्तेपुढे एका वाघिणीप्रमाणे लढणार्या ममतांची प्रतिमा तेथील मतदारांना विशेषतः महिला मतदारांना भावली नाही तरच नवल ! दिदी विरुद्ध कोण ? या प्रश्नाचे उत्तर भाजपकडेही सध्या तरी दिसत नाही.

## जीवन एक महान शाळा

गोष्ट लहान, मोठा अर्थ : शिल्पा
जीवन ही केवळ जगण्याची प्रक्रिया नसून सतत शिकत राहण्याची एक अखंड शाळा आहे. शाळेत आपण पुस्तकी ज्ञान मिळवतो, पण जीवनाच्या शाळेत आपण अनुभवांमधून खरे शिक्षण घेतो. प्रत्येक दिवस, प्रत्येक घटना आणि प्रत्येक माणूस आपल्याला काही ना काही शिकवून जातो.
लहानपणी आपण चालायला, बोलायला शिकतो; तेव्हा पडणे, चुकणे हीच आपली पहिली शिकवण असते. जसजसे आपण मोठे होतो, तसतसे जीवनातील प्रसंग अधिक गुंतागुंतीचे होतात. कधी यश मिळते, कधी अपयश येते. यश आपल्याला आत्मविश्वास देते, तर अपयश आपल्याला संयम, धैर्य आणि पुन्हा उभे राहण्याची ताकद शिकवते. जीवनाच्या शाळेत कोणताही ठरावीक अभ्यासक्रम नसतो. येथे शिक्षक म्हणून आपल्या आजूबाजूचे लोक, परिस्थिती आणि अनुभव असतात. कधी मित्रांकडून सहकार्य शिकतो, कधी कुटुंबाकडून प्रेम आणि जबाबदारी, तर कधी कठीण प्रसंगातून संघर्ष करण्याची कला शिकतो.जीवन म्हणजे नेमके काय? असा प्रश्न जर कोणी विचारला तर उत्तर देणं कठीण आहे. जीवन म्हणजे मजा आहे. जीवन म्हणजे झगडा आहे. जीवन म्हणजे कष्ट आहेत की जीवन म्हणजे उजाड वाळवंट आहे? मला वाटतं जीवन म्हणजे काय याचं उत्तर प्रत्येक जण आपल्या अनुभवावरून वेगळं देईल, मात्र ते अंतिम सत्य नसेल.या शाळेत परीक्षा देखील सतत चालू असतात, पण त्यांचे वेळापत्रक ठरलेले नसते. अचानक आलेल्या अडचणी, निर्णय घेण्याच्या वेळा आणि संकटाच्या प्रसंगी आपली खरी परीक्षा होते. या परीक्षांमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी पुस्तकातील ज्ञानापेक्षा जीवनमूल्ये अधिक महत्त्वाची ठरतात. वि. स. खांडेकरांनी म्हटलंय, जीवन विविध आहे. जीवन खरंच विविध असतं. आजचा अनुभव उद्याला नाही, उद्याचा परवाला नाही. परिस्थिती वेगळी, माणसं वेगळी त्यांचं जगणं वेगळं. वागणं परस्पराहून भिन्न. एकाला जे अमृतासमान वाटतं, ते दुसऱ्याला विषही वाटू शकतं. रोज नवा अनुभव, नवा धडा, म्हणूनच मला वाटतं जीवन ही एक शाळा आहे. ही शाळा केवळ पुस्तकं देत नाही. आजच्या पुस्तक शिक्षणातून माणूस व्यवहारकुशल बनेल याचा काही भरवसा नाही. पण जीवनरूपी शाळेत पास, नापास हा प्रश्नच उद्भवत नाही. कारण तिथं नापास होऊन जगणार नसतं. जगण्यासाठी कष्टून प्रामाणिकपणानं प्रयत्न करणारा नापास होऊच शकत नाही. या शाळेतल्या शिक्षणाला वयाची अट नाही. मनुष्य अखेरपर्यंत विद्यार्थीच राहतो, तो या जीवनरूपी शाळेत!
जीवन आपल्याला एक महत्त्वाचा धडा शिकवते - चुका करणे चुकीचे नाही, पण त्या चुका पुन्हा न करणे हेच खरे शिक्षण आहे. तसेच नम्रता, प्रामाणिकपणा, मेहनत आणि सकारात्मक दृष्टिकोन ही मूल्ये जीवनाच्या शाळेत आपल्याला यशस्वी बनवतात. म्हणूनच, जीवनाकडे केवळ समस्या म्हणून न पाहता, ती एक शिकण्याची संधी म्हणून पाहिले पाहिजे. प्रत्येक अनुभवातून काहीतरी शिकत राहिलो, तर आपण अधिक सक्षम, समंजस आणि यशस्वी होऊ शकतो. जीवनाच्या या शाळेत यशापयशाचं मोजमाप करण्यात अर्थ नसतो. नाही तर बॅरिस्टर होऊनही देशसेवेचं व्रत घेतलेल्या महात्मा गांधींनी पंचा नेसून ऐहिक सुखाचा त्याग का केला असता? देशप्रेमाने प्रेरित झालेल्या स्वातंत्र्यवीर सावरकरांनी कठोर शिक्षा निश्चयाने का पत्करली असती? जीवन ही सत-असतचा खेळ दाखविणारी शाळा आहे. परीक्षांना बसावं लागतं. मात्र या शाळेत सतत शिकायला मिळतं. निकाल अपेक्षेपेक्षा वेगळाही लागू शकतो; कारण पेपर तपासण्याचं काम नियती करत असते. जीवनाच्या शाळेत एक धडा सतत गिरवायचा असतो. जगा आणि जगू द्या (लिव्ह अँड लेट लिव्ह) बस्स एवढंच! कधी कुणी सोबत मिळत नाही. जगाच्या दृष्टीने तुम्ही अपयशी ठराल, यश मिळूनही आणि तुमची दखलही घेतली जाणार नाही. पण तुम्ही दिलेलं कार्यसिद्धतेसाठीचे बलिदान एखाद्या नव्या, तेजस्वी अन् उज्ज्वल भविष्याची अर्थपूर्ण झालेली पहाट असेल, हे मात्र नक्की! तुमच्या अस्तित्वाला जीवन म्हणून ओळख द्या. लोक जीवन जगतात आणि परमेश्वर त्यांना जगायला शिकवतो. यापैकी कोणते जीवन आपलेसे करायचे हा ज्यांचा त्यांचा प्रश्न आहे.जीवन एक शाळा, अनुभवांचे धडे, हसण्यातून शिकवते, कधी अश्रूंचे कडे। प्रत्येक वळणावर नवी परीक्षा येते, धैर्याने चालणाऱ्यांनाच यश हसत भेटते।। चुका करून शिकतो, पडून पुन्हा उभा राहतो, प्रेम, संघर्ष, सत्य यातून मार्ग शोधत जातो।
गुरू येथे काळ आणि विद्यार्थी आपण सारे, जीवनाच्या शाळेत शिकत राहू निर्धारे शेवटी असे म्हणता येईल की,जीवन हीच खरी शाळा आहे आणि आपण सर्वजण तिचे आयुष्यभर विद्यार्थी आहोत.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा




खरंतर ही अत्यंत सकारात्मक बाब आहे, असे मला वाटते. सध्या अनेक सामाजिक संस्थांनी मासिक पाळीविषयी जनजागृती करण्यासाठी पुढाकार घेतल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मासिक पाळीविषयीचे समाजातील गैरसमज दूर होत आहेत.
**–नितेश गावकर, कल्याण**
मासिक पाळी हा महिलांच्या आयुष्यातील नैसर्गिक भाग आहे. मासिक पाळी हे निसर्गाने महिलांना दिलेले एक वरदान आहे. इंटरनेटमुळे मासिक पाळीविषयीची माहिती सध्याच्या काळात सहज उपलब्ध आहे. त्याचबरोबर जाहिराती आणि चित्रपटामुळे मासिक पाळीविषयीची जनजागृती होत आहे.

## २ Joke — विनोद





**गुरूजी : सांग असत्यवादी मोठा की सत्यवादी?**
**शिष्य : असत्यवादी.**
**गुरूजी : काहीतरी भलतंच कसं काय?**
**शिष्य : सत्यवादी चार अक्षरी शब्द आहे. असत्यवादी एका अक्षराने मोठा आहे.**

## ३ Message — संदेश




Doctor: aapke pati ko zyaada rest ki zaroorat hai. yeh sleeping tablets leejiye.
Wife: unko yeh kab dena hai doctor?
Doctor: yeh unke liye nahi, aapke liye hai


## ४ Thought — सुविचार



माझे ते खरे म्हणण्यापेक्षा खरे ते माझे म्हणा.
- अज्ञात

**संस्कृत सुभाषित**
**अतिक्रान्तं हि यत्कार्य पश्चाचिंतयते नर:**
**तच्चास्य न भवेत्कार्य चिंतया च विनश्यति**
(कर्णपर्व, अध्याय ३१, ोक २९ महाभारत)
अर्थ : घटना घडून गेल्यानंतर मागाहून जो चिंता करीत बसतो, त्याचे कार्य तर होत नाहीच, पण चिंतेने नाश मात्र होतो.

## मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. '---- मोरया, मंगलमूर्ती श्री गणराया' (लता मंगेशकर)
१०. मासा पकडण्याचे साधन
११. किंमत
१२. अभिनव
१४. एक रंगीत कंदमूळ
१५. दणकट, मजबूत
१७. विद्युल्लता
१८. पुळका, गहिवर, मूळ अर्थ झरा
१९. पुष्पदल
२१. रसाळ
२३. नवरा, पती
२५. सीतेच्या जुळ्या मुलातील एक
२६. काव, तांबडी माती
२८. सारखा
३१. एक छोटे चर्मवाद्य
३३. रणक्षेत्र
३६. अंत:करण
३८. पुष्कळ
४०. चित्रपटाचे संवाद
४१. पाठविलेला
४२. कलावंत
४५. शरीर
४६. आरोप
४७. निष्ठूर, दया नसलेला
४९. सबब
५०. पू.विनोबाजींनी लिहिलेले गीतेचे मराठी अनुवादित ोक
५२. सावली, प्रतिबिंब
५३. तात्पर्य
५६. एक श्वासरोग
५७. अजगर
५८. तंतोतंत जुळणारे
६०. आपला-परका अशी भावना
६३. दृष्टी, दृष्ट
६५. अति उंचीची दोन झाडे
६७. अटीची भाषा
६९. मुस्लिम प्रार्थना पद्धत
७१. पत्र
७३. लोकर, लव (इंग्रजी)
७४. शिजविलेले तांदूळ
७५. नूतन
७७. मस्ती, जोम
७८. घरोघरी पूर्वी मातीच्या असायच्या
८०. अर्धी ओंजळ
८२. सुका, वाळलेला
८४. न घडवलेले, न रूळलेले
८५. कहाणीतील गाव
८६. गुरांचे खाद्य

### उभे शब्द

१. ऐटदार चालीची स्त्री
२. पोलिस
३. गर्भाचे पोषण करणारी
४. तारण
५. मीठ
६. विधानसभेचा सदस्य
७. नमनीय
८. खूप लांब (अंतरावर)
९. जनतेचा कल आणि कौल
१३. खस
१५. फुलाची प्रथमावस्था
१६. कोवळ्या दुधाचा पदार्थ
१८. पार्वतीला शंकराने दिलेले नाव
२०. उन्हाचे तुकडे
२२. लाकडी जिना
२४. कोळिष्टक
२७. आईची वहीनी
२९. झकास
३०. अनुमती
३२. सडेतोड बोलणारा
३४. सुसर
३५. मुक्या प्राण्यांवरील प्रेम
३७. नकला करणारा
३८. रामबंधु
३९. मज्जाव, बंदी
४०. पाडाव, ऱ्हास
४३. कपडालत्ता
४४. हे दिवस ऋण काढून साजरे करू नयेत
४६. जननी, जन्म देणारी
४७. कीव, करुणा
४८. अत्यंत खालच्या दर्जाचा
५१. दिनांक
५३. वस्तू, माल
५४. अील, बीभत्य- ---- विचकट
५५. धन्यवादाचा शब्द
५७. नाविक दल
५९. वेल
६०. आमचा (बंगाली)
६१. चित्रपट
६२. मायभूमी, जमीन
६४. लोक, प्रजा
६६. छोटा डफ
६८. रविवासर
७०. जगन्माता
७२. पवित्र, शुद्ध
७६. तोटी
७८. उजेडासाठी पेटवलेली गवत इ.ची जुडी
७९. स्तुती करणारा
८१. लहान
८३. कावळा

### आडवे उत्तर

१.गजानना श्री गणराया आधी वंदू तुज १०.गळ ११.दर १२.नवा १४.गाजर १५.कणखर १७.दामिनी १८.उमाळा १९.पाकळी २१.रसदार २३.यजमान २५.लव २६.काव २८.सम ३१.डफ ३३.समरभूमी ३६.मन ३८.भरमसाट ४०.पटकथा ४१.रवाना ४२.कलाकार ४५.तन ४६.आळ ४७.दयाहीन ४९.कारण ५०.गीताई ५२.पडछाया ५३.सार ५६.दमा ५७.आर ५८.चपखल ६०.आपपरभाव ६३.नजर ६५.ताडमाड ६७.जरतर ६९.नमाज ७१.टपाल ७३.फर ७४.भात ७५.नवीन ७७.रग ७८.चुली ८०.पसा ८२.वाळका ८४.अनघड ८५.आटपाटनगर ८६.कडबा

### उभे उत्तर

१.गजगामिनी २.नगरपाल ३.नाळ ४.गहाण ५.रामरस ६.आमदार ७.वंदनीय ८.दूर ९.जनमानस १३.वाळा १५.कळी १६.खरवस १८.उमा २०.कवडसा २२.दादर २४.जळमट २७.मामी २९.मस्त ३०.पवानगी ३२.फटकळ ३४.मगर ३५.भूतदया ३७.नकलाकार ३८.भरत ३९.मना ४०.पतन ४३.कापडचोपड ४४.सणवार ४६.आई ४७.दया ४८.हीन ५१.तारीख ५३.सामान सामान ५४.अचकट ५५.आभार ५७.आरमार ५९.लता ६०.आमार ६१.रजतपट ६२.वतन ६४.जन ६६.डफली ६८.रविवार ७०.जगदंबा ७२.पावन ७६.नळ ७८.चुड ७९.भाट ८१.सान ८३.काक



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### वैभव सूर्यवंशीनं ४७३ चेंडूंमध्ये ठोकल्या १००० धावा

**जयपूर**–राजस्थान रॉयल्सचा स्फोटक फलंदाज वैभव सूर्यवंशीनं आयपीएल २०२६ च्या ३६व्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादविरुद्ध शानदार शतक झळकावलं. त्यानं ३७ चेंडूंमध्ये पाच चौकार आणि १२ षटकारांसह १०३ धावा केल्या. या शतकासह त्यानं टी–२० क्रिकेटमध्ये एक विश्वविक्रमही प्रस्थापित केला. ऑस्ट्रेलियाच्या मिचेल ओवेनचा विक्रम मोडून तो टी–२० फॉरमॅटमध्ये सर्वात जलद १००० धावा करणारा फलंदाज ठरला.

वैभव सूर्यवंशीनं १००० धावा करण्यासाठी किती चेंडू घेतले? : वैभव सूर्यवंशी चेंडूंच्या संख्येनुसार टी–२० फॉरमॅटमध्ये सर्वात जलद १००० धावा करणारा फलंदाज ठरला आहे. यापूर्वी हा विक्रम मिचेल ओवेनच्या नावावर होता. त्यानं ५३३ चेंडूंमध्ये १००० धावा पूर्ण करून टी–२० क्रिकेटमध्ये सर्वात जलद १००० धावा करण्याचा विश्वविक्रम प्रस्थापित केला होता. आता, अवघ्या ४७३ चेंडूंमध्ये १००० धावा करुन वैभव सूर्यवंशीनं हा विश्वविक्रम आपल्या नावावर केला आहे. वैभवनं आतापर्यंत टी–२० क्रिकेटमध्ये २०० पेक्षा जास्त स्ट्राइक रेटनं धावा केल्या आहेत. या यादीत तिसऱ्या क्रमांकावर ऑस्ट्रेलियाचा माजी क्रिकेटपटू अँड्र्यू सायमंड्स आहे, ज्यानं ५५८ चेंडूंमध्ये १००० टी–२० धावा पूर्ण केल्या होत्या.

### भज्जीला झटका, केंद्र सरकार लगेचच पुढं सरसावलं, घेतला मोठा निर्णय

**मुंबई**–भारताचे माजी क्रिकेटपटू आणि राज्यसभा खासदार हरभजन सिंग याने मआपफ सोडून भाजपमध्ये प्रवेश केला होता. या घटनेनंतर शनिवारी अज्ञातांनी हरभजन सिंह यांच्या घराबाहेर मपंजाबचा गद्दारफ असं लिहत त्याच्या निर्णयाला विरोध केला होता. यासोबत पंजाबमधील आप सरकारने हरभजनने पक्ष सोडताना त्यांची सुरक्षा काढून घेतली होती. त्यामुळे हरभजन सिंहच्या सुरक्षेचा मोठा प्रश्न होता.पण आता केंद्र सरकारकडून त्याला सिक्युरीटी प्रदान करण्यात आली आहे.

खरं तर शुक्रवारी राघव चड्ढ,हरभजन सिंहसह इतर खासदरांनी आपफ सोडून भाजपमध्ये प्रवेश केल्यामुळे निर्माण झालेल्या राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर ही घडामोड घडली. मआपफच्या कार्यकर्त्यांनी अलीकडेच पक्षांतर केलेल्या अनेक नेत्यांच्या घराबाहेर निदर्शने केली होती. आप कार्यकर्त्यांनी हरभजनच्या घरापुढील भिंतींवर मगद्दारफ असे स्प्रे–पेंटने लिहिले होते. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनीही या नेत्यांना मगद्दारफ म्हटले होते.त्यातून हरभजनच्या घराबाहेर गद्दार लिहण्यात आलं होतं. या घटनेनंतर पंजाब सरकारने हरभजन सिंह यांची सुरक्षा काढून घेण्यात आली होती. पण आता केंद्र सरकारकडून त्याला सुरक्षा देण्यात आली आहे.

### टीम इंडियाला मिळाले ३ नवे डेंजरस ओपनर्स; बीसीसीआय च्या निवड समितीची झोप उडाली

**मुंबई**–आयपीएल २०२६ हंगाम आतापर्यंत युवा खेळाडूंसाठी जबरदस्त ठरला आहे. वैभव सूर्यवंशी, प्रियांश आर्य, अंशुल कंबोज आणि प्रिन्स यादव यांसारख्या भारतीय तरुणांनी आपल्या खेळाने अक्षरश: धुमाकूळ घातला आहे. विशेषत: काही ओपनिंग फलंदाजांनी पहिल्याच ६ षटकांत गोलंदाजांची धुलाई करत प्रेक्षकांना थक्क केलं आहे. भविष्यात हेच खेळाडू टीम इंडियासाठी डावाची सुरुवात करताना दिसू शकतात.

वैभव सूर्यवंशी

सर्वप्रथम नाव घ्यावं लागेल वैभव सूर्यवंशीचं. अवघ्या १५ व्या वर्षी हा तरुण फलंदाज दिवसेंदिवस अधिक परिपक्व होत चालला आहे. आयपीएल २०२६ मध्ये तो ऑरेंज कॅपचा प्रमुख दावेदार ठरला आहे. राजस्थान रॉयल्ससाठी खेळताना त्याने ८ सामन्यांत ३५७ धावा केल्या आहेत. विशेष म्हणजे त्याने फक्त ३६ चेंडूत शतक झळकावून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. काही माध्यमांतील वृत्तांनुसार, आयर्लंड दौऱ्यासाठीही त्याची निवड होण्याची शक्यता आहे.

# केकेआरचा लखनौवर रोमांचक विजय!

## सुपर ओव्हरमध्ये पहिल्याच चेंडूवर जिंकला सामना; रिंकू–नरेनची चकित करणारी कामगिरी

नवी दिल्ली: लखनौ सुपर जायंट्स व कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात एक रोमांचक सामना पाहायला मिळाला. संघाने सुपर ओव्हरमध्ये दणदणीत विजय मिळवला. अखेरच्या चेंडूवर लखनौला विजयासाठी ७ धावांची गरज असताना मोहम्मद शमीने षटकार खेचला आणि सामना बरोबरीत आणला. यासह सुपर ओव्हर खेळवण्यात आली. केकेआरच्या या सामन्याचे हिरो ठरले रिंकू सिंह व सुनील नरेन. रिंकू सिंहने या सामन्यात ८१ धावांची खेळी करत फिल्डिंग करताना ६ झेल टिपले. तर सुनील नरेनने न भूतो न भविष्यती अशी गोलंदाजी केली. त्याने सुपर ओव्हरमध्ये पहिल्या ३ चेंडूत विकेट्स घेत संघाला फक्त २ धावांचं विजयासाठी आव्हान दिलं.

सुपर ओव्हरसाठी लखनौ सुपर जायंट्स संघाकडून एडन मारक्रम व निकोलस पुरनची जोडी मैदानात आली. तर केकेआरकडून सुनील नरेन गोलंदाजीसाठी आला. पुरनला नरेनने पहिल्याच चेंडूवर क्लीन बोल्ड केलं. त्यानंतर ऋषभ पंत फलंदाजीला आला. त्याने एक धाव घेतली. त्यानंतर मारक्रम तिसऱ्या चेंडूवर स्ट्राईकवर आला आणि तो मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात झेलबाद झाला. रिंकू सिंह व रोव्हमन पॉवेल यांनी रिले कॅच पकडत दुसरी विकेट घेतली. यासह दोन विकेट्स गमावल्याने केकेआरला विजयासाठी २ धावांची गरज आहे.



**केकेआर आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात लो स्कोरिंग थ्रिलर सामना पाहायला मिळाला. तर अखेरच्या चेंडूवर स्कोअर बरोबरीत आणल्याने सुपर ओव्हर पाहायला मिळाली.**

केकेआरकडून धावांचा पाठलाग करण्यासाठी रिंकू सिंह व रोव्हमन पॉवेल ही जोडी मैदानावर उतरली. तर लखनौकडून गोलंदाजीसाठी प्रिन्स यादव आला. केकेआरला विजयासाठी २ धावांची गरज होती. प्रिन्स यादवच्या पहिल्या चेंडूवर रिंकूने चौकार लगावत संघाला रोमांचक विजय मिळवून दिला.

लखनौला अखेरच्या चेंडूवर ७ धावांची गरज असताना काय घडलं?

लखनौला अखेरच्या षटकात विजयासाठी १७ धावांची गरज होती. कार्तिक त्यागीकडे गोलंदाजीची संधी दिली. त्याने पहिल्या चेंडूवर एक धाव दिली. तर दुसरा चेंडू नो बॉल टाकला. त्यानंतर फ्री हिटचा चेंडू देखील कार्तिक त्यागीने नो बॉल टाकला. त्यानंतर लीगल दुसऱ्या चेंडूवर हिम्मत सिंगने एक चौकार मारला. त्यानंतर तिसऱ्या चेंडूवर हिम्मत सिंग झेलबाद झाला. चौथ्या चेंडूवर एक धाव तर पाचवा चेंडू निर्धाव राहिला. यानंतर शमीने अखेरच्या चेंडूवर षटकार लगावत सामना बरोबरीत आणला. त्यामुळे सामन्याचा मोर्चा सुपर ओव्हरपर्यंत पोहोचला.केकेआरने दिलेल्या १५६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना लखनौची सुरूवात फारशी चांगली झाली नाही. मिचेल मार्श २ धावांवर बाद झाला. यानंतर एडन मारक्रम व ऋषभ पंत यांनी अर्धशतकी भागीदारी साकारत संघाचा डाव सावरला. मारक्रम ३१ धावा करत बाद झाला. यानंतर ऋषभ पंत ४२ धावांची खेळी करत माघारी परतला. निकोलस पुरन ९ धावांवर बाद झाल्याने त्याचा खराब फॉर्म पुन्हा दिसून आला. जॉर्ज लिंडे २ चौकार मारून ८ धावा करत बाद झाला. केकेआरकडून वरूण चक्रवर्ती व वैभव अरोरा यांनी प्रत्येकी २–२ विकेट्स घेतल्या. तर अनुकूल रॉय, कॅमरून ग्रीन व सुनील नरेन यांनी प्रत्येकी १–१ विकेट्स घेतल्या.

लखनौने नाणेफेक जिंकत केकेआरला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. केकेआरची सुरूवात पुन्हा एकदा खूप खराब झाली. टीम सेफर्ट शून्यावर तर अजिंक्य रहाणे १० धावांवर बाद झाला. यानंतर अंगक्रिश रघुवंशीला ऑबस्ट्रक्टिंग द फिल्डमुळे बाद देण्यात आलं. यानंतर कॅमेरून ग्रीनने ५१ चेंडूत ३ षटकारांसह ३४ धावांची खेळी केली. तर रिंकूने धमाकेदार खेळी करत संघाला सन्मानजनक धावसंख्येपर्यंत पोहोचवलं. रिंकूने ५१ चेंडूत ७ चौकार व ५ षटकारांसह ८३ धावांची खेळी केली. रिंकूने अखेरच्या षटकात सलग ४ षटकार खेचत केकेआरला २० षटकांत ७ बाद १५५ धावांपर्यंत पोहोचवलं.

लखनौकडून मोहसीन खानने भेदक गोलंदाजी करत ४ षटकांत २३ धावा देत ५ विकेट्स घेतल्या. यासह यंदाच्या आयपीएलमध्ये फायफर घेणारा तो पहिला गोलंदाज ठरला. तर जॉर्ज लिंडेने १ विकेट घेतली.

# गुजरातकडून चेन्नईचालाजिरवाणा पराभव!

आयपीएल २०२६ च्या ३७ व्या सामन्यात मोठा उलटफेर पाहायला मिळाला. गुजरातने चेन्नईला त्यांच्या घरच्या मैदानावर, म्हणजेच चिदंबरम स्टेडियमवर धूळ चारली. गुजरातने हा सामना तब्बल ८ गडी राखून जिंकत स्पर्धेत दमदार पुनरागमन केलं आहे.

पहिला बॅटिंग करताना चेन्नईची सुरुवात चांगली झाली होती, पण अचानक सामना फिरला. रबाडा आणि सिराज यांनी अक्षरशः कहर केला. फक्त ७ चेंडूत संजू सॅमसन, उर्विल पटेल आणि सरफराज खान यांना त्यांनी पॅव्हेलियनमध्ये पाठवले. त्यानंतर ऋतुराज गायकवाड आणि शिवम दुबे यांनी चेन्नईची बाजू सांभाळली. यामुळे चेन्नईने अखेर १५८ धावांपर्यंत



मजल मारली.

बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनचा ऐतिहासिक निर्णय! खेळाच्या अनेक नियमांमध्ये बदल

मुंबई : बॅडमिंटनचे सामने आता २१३ पद्धतीऐवजी १५३ गुणपद्धतीनुसार खेळले जातील. सामने आता तीन २१२१ गेम्सऐवजी तीन १५१५ गेम्समध्ये खेळले जाणार आहेत. ...

या धावांचा पाठलाग करताना गुजरातची सुरुवात स्फोटक झाली. साई सुदर्शन शानदार ८७ धावांची खेळी खेळाला. त्याला साथ दिली कर्णधार गिल आणि बटलर यांनी गिलने ३३ धावा केल्या तर जॉस बटलरने नाबाद ३९ धावा केल्या. त्यामुळे केवळ १६.२ षटकांत २ विकेट्स गमावून गुजरातने हा सामना जिंकला.

या विजयामुळे गुजरात टायटन्सने गुणतालिकेत थेट ५ व्या स्थानावर झेप घेतली आहे. त्यामुळे प्ले–ऑफचं गणित आता अधिकच कठीण झालं आहे.

# वैभव सूर्यवंशीचा महाविक्रम, गिलचा विक्रम मोडला

जयपूर : सवाई मानसिंह स्टेडियमवर झालेल्या सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध राजस्थान रॉयल्स या सामन्यात नाणेफेक जिंकून हैदराबादने गोलंदाजीचा निर्णय प्रथम फलंदाजी करणाऱ्या राजस्थानने २० षटकांत सहा बाद २२८ धावा केल्या तर हैदराबादने १८.३ षटकांत ५ बाद २२९ धावा करून सामना पाच विकेट आणि नऊ बॉल राखून जिंकला. या विजयामुळे सनरायझर्स हैदराबाद (०.८१५) पॉइंट्स टेबल अर्थात गुणतक्त्यात दहा गुणांसह तिसऱ्या स्थानी तर राजस्थान (०.६०२) दहा गुणांसह चौथ्या स्थानावर आहे.जयपूरमध्ये झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सच्या वैभव सूर्यवंशीने ३७ चेंडूत १२ षटकार आणि ५ चौकारांच्या जोरावर १०३ धावा केल्या. साकीब हुसेनच्या चेंडूवर तो पायचीत झाला. वैभवने आयपीएल २०२६ च्या ३६ व्या साखळी सामन्यात ३६ चेंडूत शतक केले. अवघ्या १५ वर्षांच्या या फलंदाजाने प्रफुल्ल हिंगेच्या पहिल्याच षटकात चार षटकार मारून दमदार सुरुवात केली. आयपीएलच्या इतिहासात एखाद्या खेळाडूने डावाच्या पहिल्याच षटकात चार षटकार मारण्याची ही पहिलीच वेळ. याआधी डावाच्या पहिल्या षटकातील सर्वोत्तम कामगिरी २००९ मध्ये ब्रॅड हॉजविरुद्ध नमन ओझाने केली

# बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनचा ऐतिहासिक निर्णय!

मुंबई : बॅडमिंटनचे सामने आता २१३ पद्धतीऐवजी १५३ गुणपद्धतीनुसार खेळले जातील. सामने आता तीन २१२१ गेम्सऐवजी तीन १५१५ गेम्समध्ये खेळले जाणार आहेत. डेन्मार्कच्या हॉर्सेन्स येथे झालेल्या बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत या नवीन गुणपद्धतीला प्रचंड बहुमताने मंजुरी देण्यात आली. सभेत सादर केलेला प्रस्ताव १९८–४३ मतांनी मंजूर झाला. ही नवीन पद्धत ४ जानेवारी २०२७ पासून लागू होणार आहे.

बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनचा युक्तिवाद आहे की, या नवीन पद्धतीमुळे खेळात लवकरच उच्च–दबावाच्या हालचाली निर्माण होतील आणि खेळातील रोमांच वाढेल. बॅडमिंटनमध्ये सध्याचा २१–पॉइंट प्रकार २००६ मध्ये सुरू करण्यात आला होता. या प्रकारानुसार, सामने सातत्याने



४५ ते १०० मिनिटांपर्यंत लांबत होते, ज्यामुळे प्रसारक नाराज झाले होते. त्यांनी मागणी केली की सर्व पाच विभागांतील (पुरुष आणि महिला एकेरी, दुहेरी आणि मिश्र) सामने तीन तासांच्या आत पूर्ण केले जावेत. बीडब्ल्यूएफच्या अध्यक्षा खुनयिंग पटमा लीसावडट्रकुल म्हणाल्या की, हा निर्णय बॅडमिंटनच्या भविष्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे.

झींपक्षरल घळपसी : पंजाबचा दिल्ली विरुद्धच्या सामन्यात ऐतिहासिक विजय, सर्वात मोठ्या धावसंख्येचा केला यशस्वी पाठलाग.नवी दिल्ली : पंजाब किंग्सने शनिवारी दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध ६ गडी राखून विजय मिळवत आयपीएलच्या इतिहासातील सर्वात मोठ्या धावसंख्येचा यशस्वी पाठलाग (रन ...

आम्ही पुढच्या पिढीसाठी एक खेळ तयार करत आहोत आणि आम्ही आमच्या खेळाडूंच्या दीर्घकालीन भविष्यात गुंतवणूक करत राहू. ३१५ गुणपद्धतीचा उद्देश बॅडमिंटनला अधिक रोमांचक आणि स्पर्धात्मक बनवणे, वेळापत्रकात सुधारणा करणे, सामन्याच्या वेळेत अधिक एकसमानता आणणे आणि खेळाडूंचे आरोग्य व पुनर्वसनासाठी संभाव्य फायदे प्रदान करणे हा आहे, असे लीसावडट्रकुल यांनी एका निवेदनात म्हटले आहे.

जागतिक संस्थेने सांगितले की, सदस्य आणि हितधारकांशी चाचणी, विश्लेषण आणि सल्लामसलत करण्याच्या प्रदीर्घ प्रक्रियेनंतर हा निर्णय घेण्यात आला. हे खेळाडूंच्या आरोग्याप्रती असलेल्या वचनबद्धतेतून आणि खेळाडूंना अधिक दीर्घ व यशस्वी कारकीर्द घडवण्यासाठी मदत करण्याच्या हेतूने प्रेरित, बीडब्ल्यूएफ सदस्यांचे सामूहिक मत दर्शवते.

प्रमुख बदल असतील:

खेळाच्या मध्यातला ६० सेकंदांचा ब्रेक आता ११ व्या पॉईंटऐवजी ८ व्या पॉईंटवर असेल.दोन गेम्समधील ब्रेक १२० सेकंदांचा असेल.

१५ पॉईंट्सवर पोहोचल्यावर खेळाडूला दोन पॉईंट्सची आघाडी कायम ठेवावी लागेल.जास्तीत जास्त पॉईंटची मर्यादा आता ३०–२९ ऐवजी २१–२० असेल.

### आशियाई २०३८ स्पर्धेसाठी भारताचा दावा

नवी दिल्ली: भारताने २०३८च्या आशियाई क्रीडा स्पर्धांचे यजमानपद भूषविण्यासाठी अधिकृतरीत्या आपली इच्छा व्यक्त केली आहे. देशाच्या ऑलिम्पिक संस्थेच्या एका वरिष्ठ अधिकार्याने ही माहिती दिली आहे. जागतिक स्तरावरील मोठ्या बहु–क्रीडा स्पर्धांचे केंद्र बनण्याच्या देशाच्या व्यापक रणनीतीच्या दिशेने टाकलेले हे एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. भारतीय ऑलिम्पिक संघटनेने (आयओए) नुकतेच आशियाई ऑलिम्पिक परिषदेकडे (ओसीए) २०३८च्या आशियाड स्पर्धासाठीचा आपला प्रस्ताव सादर केला आहे. शहरात झालेल्या आपल्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत भारताच्या या प्रस्तावावर चर्चादेखील केली

# लागोपाठ ५ पराभव, लखनौकडे अजूनही प्लेऑफमध्ये जाण्याची संधी; कसं असेल समीकरण?

ऋषभ पंतच्या नेतृत्वाखाली खेळत असलेल्या लखनौने लागोपाठ ५ सामने गमावले आहेत. अजूनही या संघाकडे प्लेऑफमध्ये जाण्याची संधी असणार आहे. दरम्यान कसं असेल समीकरण? जाणून घ्या.

लखनौ सुपर जायंट्स संघाला आयपीएल २०२६ स्पर्धेत हवी तशी कामगिरी करता आलेली नाही. ऋषभ पंतच्या नेतृत्वाखाली खेळताना लखनौ सुपर जायंट्स संघाला लागोपाठ पाचव्या पराभवाला सामोरं जावं लागलं आहे. तसेच हा लखनौच्या या हंगामातील सहावा पराभव ठरला. लखनौला ८ पैकी केवळ २ सामन्यांमध्ये विजय मिळवता आला आहे. कोलकाता नाईट रायडर्स संघाविरूद्ध झालेल्या सामन्यातील पराभवानंतर लखनौ सुपर जायंट्सचा संघ गुणतालिकेत सर्वात शेवटी आहे. दरम्यान या पराभवानंतरही लखनौचा संघ गुणतालिकेत प्रवेश करू शकतो का? जाणून घ्या कसं असेल समीकरण.

पहिलं समीकरण

लखनौ सुपर जायंट्सचा संघ अजूनही प्लेऑफमध्ये प्रवेश करु शकतो.

त्यासाठी लखनौला पुढील सर्व ६ सामन्यांमध्ये विजय मिळवावा लागणार आहे. असं झाल्यास लखनौचा संघ १६ गुणांपर्यंत पोहोचू शकतो. जर लखनौचा संघ १६ गुणांपर्यंत पोहोचला, तर स्वबळावर प्लेऑफमध्ये प्रवेश करु शकतो.

दुसरं समीकरण

लखनौ सुपर जायंट्सचे आतापर्यंत जितके सामने शिल्लक आहेत, त्यापैकी



केवळ १ सामन्यात पराभव झाला, तर लखनौचा प्लेऑफमध्ये जाण्यास मार्ग मोकळा असेल. कारण असं झाल्यास लखनौ सुपर जायंट्सचा संघ १४ गुणांसह प्लेऑफमध्ये प्रवेश करू शकतो. यासाठी नेट रनरेट महत्वाचा ठरेल. तसेच इतर संघांच्या कामगिरीवर अवलंबून राहावं लागेल.

जर लखनौ सुपर जायंट्सने उर्वरीत सामन्यांपैकी २ सामने गमावले, तर लखनौचा संघ अधिकृतरित्या स्पर्धेतून बाहेर पडेल. त्यानंतर सर्व सामने जिंकूनही लखनौचा संघ प्लेऑफमध्ये प्रवेश करू शकणार नाही. १२ गुणांसह प्लेऑफमध्ये गाठणं खूप कठीण आहे. कारण काही संघांनी ७ सामन्यांनंतरच १० गुण कमावले आहेत. आता लखनौचा संघ कशी कामगिरी करणार हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.लखनौचा पराभव–या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना कोलकाता नाईट रायडर्स संघाला ७ गडी बाद १५५ धावा करता आल्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या लखनौने देखील १५५ धावा करून धावसंख्या बरोबरीत आणली. त्यामुळे सामना सुपर ओव्हरमध्ये गेला. सुपर ओव्हरमध्ये लखनौ सुपर जायंट्स संघाला केवळ १ धाव करता आली. यासह २ धावांचा पाठलाग करताना कोलकाता नाईट रायडर्सने विजय मिळवला.

## महावितरणच्या मान्सूनपूर्व देखभाल, दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे आता सकाळच्या सत्रात होणार

**लातूर/प्रतिनिधी :** उन्हाळ्यात विजेच्या वाढत्या मागणीच्या कालावधीत आणि पावसाळी परिस्थितीत वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणकडून वीज यंत्रणेशी संबंधित विविध देखभाल व दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे सध्या वेगात सुरु आहे. मात्र उन्हाचा तडाख्यात नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी देखभाल व दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे संबंधित दिवशी सकाळी ७ ते ११ वाजेदरम्यान करावेत असे निर्देश मुख्यालयाकडून क्षेत्रीय कार्यालयांना शनिवारी (दि. २५) देण्यात आले.

महावितरणची प्रामुख्याने पावसाळ्यात वीजयंत्रणा सज्ज ठेवण्यासाठी तसेच वीजपुरवठा खंडित होणे व वीजसुरक्षेचे धोके टाळण्यासाठी वीज ग्राहकांना पूर्वसूचना देऊन देखभाल व दुरूस्तीचे कामे वीजराज्यभरात सध्या सुरु आहे. साधारणतः मे महिन्याच्या अखेरीस सर्व कामे पूर्णत्वास जातात. मात्र सद्यस्थितीत सकाळी १० ते दुपारी २ किंवा चार वाजेपर्यंत वीज पुरवठा बंद ठेवत देखभाल व दुरुस्तीचे कामे सुरु आहेत. नागरिकांसाठी ही गैरसोयीची वेळ टाळण्यासाठी यापुढे संबंधित दिवशी व वीजवाहिनीच्या पूर्वनियोजित देखभाल व दुरुस्तीचे काम यापुढे सकाळी ७ ते ११ वाजेदरम्यान करण्याचे निर्देश मुख्यालयाकडून देण्यात आले आहे. महावितरणच्या देखभाल दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे करताना सर्वप्रथम प्राधान्याने पर्यायी वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याचे तसेच संबंधित वीजग्राहकांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर 'एसएमएस'द्वारे तसेच प्रसिद्धी माध्यमांद्वारे कळविण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

मान्सूनपूर्व देखभाल व दुरूस्तीच्या पूर्वनियोजित कामांमध्ये प्रामुख्याने वीजवाहिन्यांना स्पर्श करणाऱ्या झाडांच्या छोट्या फांद्या तोडणे, तूटलेले पीन व डिस्क इन्सूलेटर्स बदलणे, वितरण रोहित्रे, फिडर पिलर, रिंगमेन युनिटचे अर्थिंग तपासणे, ऑइल फिल्टरेशन व ऑइल टॉपिंग अप, रोहित्राच्या वितरण पेटीची दुरुस्ती, नादुरुस्त लाईटनिंग अरेस्टर बदलणे, वीजखांब व तारांचे मजबुतीकरण, तारांमधील झोल काढणे, गंजलेले किंवा खराब झालेले वीजखांब बदलणे, जुन्या वीजतारा बदलणे, फिडर पिलरची साफसफाई व आवश्यकतेनुसार इन्सूलेशन स्प्रे मारणे, उच्च व लघुदाब वीजतारांना गार्डिंग करणे यासह उपकेंद्रातील ब्रेकर्सची दुरुस्ती, बॅटरी चार्जिंग, पॉवर ट्रान्सफॉर्मरची देखभाल व ऑइल टॉपिंग अप अशा व इतर विविध दुरुस्ती कामांसह वीजपुरवठ्याच्या पर्यायी यंत्रणा सज्ज करणे आदी कामे करण्यात येत आहेत.

## लातूर तालुक्यात मतदार यादी मॅपिंग मोहिमेसाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी आणि दुबार किंवा तिबार मतदारांचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. लातूर तालुक्यात २५ एप्रिल २०२६ पासून या मॅपिंग प्रक्रियेसाठी सर्व मतदान केंद्रांवर मतदार नोंदणी अधिकारी (बीएलओ) दररोज सायंकाळी ४ ते ७ या वेळेत उपलब्ध राहतील, तसेच इतर वेळी ते मतदारांच्या घरोघरी जाऊन भेट देणार आहेत.

या पडताळणीसाठी मतदारांना त्यांचे ओळखपत्र बीएलओंना दाखवावे लागेल, ज्याद्वारे २००२ मधील मतदार संघ, यादी भाग क्रमांक आणि अनुक्रमांकाच्या आधारे माहितीची खातरजमा केली जाईल. ज्या मतदारांचे नाव २००२ च्या यादीत नाही किंवा ज्यांनी त्यानंतर नाव नोंदवले आहे, अशा मतदारांची पडताळणी त्यांच्या आई-वडील किंवा आजी-आजोबांच्या नावाच्या आधारे केली जाणार आहे. जे मतदार ही मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करणार नाहीत, त्यांना भविष्यात मतदार यादीच्या सखोल पुनरीक्षण मोहिमेवेळी निवडणूक अधिकाऱ्यांसमोरील सुनावणी आणि पुराव्यांच्या पडताळणीला सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे ही प्रक्रिया टाळण्यासाठी सर्व मतदारांनी प्रशासनाला सहकार्य करून आपले मॅपिंग करून घ्यावे, असे आवाहन लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे (विरोळे) आणि तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

## कोकळगाव येथे हिवताप दिनानिमित्त जनजागृती

**निलंगा/आयुब बागवान:** क हिवताप दिनाचे औचित्य साधून कोकळगाव गावांमध्ये पत्रके वाटून हिवतापाविषयी जनजागृती करण्यात आली.



यामध्ये सर्व नागरिकांना हिवताप व किटकजन्य आजाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले व गप्पी मासे लारव्हा कसे खातात व गप्पी माश्यांची उपयुक्तता व डासांची पैदास कशी रोखतात याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. हिवताप, डेंग्यू, चिकनगुनिया, हत्तीरोग या आजाराचे डास घरघुती पाणी, घरघुती भांडी, टाकी, रांजण, माठ,जुनाट टायर,फुटके डब्बे, फुटलेल्या बादल्यामध्ये साचलेल्या पाण्यात,नालीत हे डास अंडी देतात व डास तयार होऊन हे आजार होण्याची शक्यता आहे त्यासाठी सर्व नागरिकांनी आपल्या घरी व परिसरात स्वच्छता ठेवून खालील उपाययोजना कराव्यात असे आरोग्य शिक्षण देण्यात आले.

वरील बाबतीत नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. जागतिक हिवताप दिन जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.संजय पवार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.प्रदीपकुमार जाधव व मदनसुरी प्रा.आ. केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.स्नेहा मुळजे, डॉ.शितल साळुंके, आरोग्य निरीक्षक ओमप्रकाश भोजने, जी.जी. गिरी प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी जयप्रकाश सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. जागतिक हिवताप दिन साजरा करण्यासाठी आरोग्य कर्मचारी राहुल भोसले, आरोग्यसेविका सी.के.जाधव यांनी परिश्रम घेतले.

# मध्य रेल्वे आरपीएफ पथकाने सिद्धेश्वर एक्सप्रेसमधील दरोड्याचा प्रयत्न हाणून पाडला - ९ महिलांना अटक

**मुंबई/प्रतिनिधी :** मध्य रेल्वे आरपीएफ पथकाने दिनांक २२.०४.२०२६ रोजी गाडी क्रमांक १२११५ सिद्धेश्वर एक्सप्रेसमधील दरोड्याचा प्रयत्न हाणून पाडला आणि या गुन्ह्याप्रकरणी ९ महिला गुन्हेगारांना अटक केली.

दिनांक २२.०४.२०२६ रोजी, कुर्डुवाडी स्थानकावर कर्तव्यावर असलेल्या गुन्हे प्रतिबंध व शोध पथकाचे (CPDS) हेड कॉन्स्टेबल श्री शिवाजी मुंडे यांना ३ महिला संशयास्पद रीतीने फिरताना दिसल्या. या महिलांना त्यांच्या ठावठिकाण्याबद्दल विचारपूस करण्यात आली आणि स्थानक सोडून जाण्याचा इशारा देऊन सोडून देण्यात आले. या महिला गाडी क्रमांक २२१०८ लातूर एक्सप्रेसमध्ये चढताना दिसल्या आणि त्यानंतर सोलापूर पथकाला संपूर्ण मार्गावर हाय अलर्ट जारी करण्याची माहिती देण्यात आली.

आरोपी जेऊर स्थानकावर उतरल्या, जिथून त्या दरोडा टाकण्याच्या उद्देशाने गाडी क्रमांक १२११५ सिद्धेश्वर एक्सप्रेसमध्ये चढल्या.

आरपीएफचे पथक आधीच कामावर होते आणि सिद्धेश्वर एक्सप्रेसच्या एस्कॉर्टिंग टीमला, म्हणजेच हेड कॉन्स्टेबल हरमेंद्र प्रसाद मीना आणि कॉन्स्टेबल ब्रजेश यादव यांना संदेश देत होते. तसेच, छायाचित्रे, प्रवासी इत्यादींच्या मदतीने संशयितांवर सतत पाळत ठेवत होते. लेडी कॉन्स्टेबल सोनम पठाण यांच्यासह आरपीएफ कर्मचाऱ्यांचे एक पथक सोलापूर स्टेशनवर तयार होते, जिथे सर्व ९ आरोपी महिला गुन्हेगारांना ताब्यात घेण्यात आले. १८ ते ४० वर्षे वयोगटातील या संशयित महिला धाराशिव जिल्ह्यातील रहिवासी आहेत.

आरोपींना जीआरपी/कुर्डूवाडीच्या ताब्यात देण्यात आले आणि भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ च्या कलम ३१०(४) (दरोड्याची तयारी) अंतर्गत गुन्हा क्र. २६/२०२६ द्वारे गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा तपास सुरू आहे, ज्यामध्ये संशयितांच्या पूर्वीच्या गुन्हेगारी नोंदींचा आढावा घेतला जात आहे.

या टोळीबाबतची संबंधित माहिती पुणे विभागाला कळवण्यात आली आहे, कारण ते सोलापूर आणि पुणे या दोन्ही विभागांमध्ये कार्यरत असल्याचे ज्ञात आहे.



या प्रदेशात प्रवाशांची सुरक्षा आणि सुरक्षितता वाढवण्यासाठी रेल्वे सुरक्षा दलाच्या (आरपीएफ) समन्वित प्रयत्नांचे मध्य रेल्वे कौतुक करते. प्रवाशांना सतर्क राहण्याचा आणि कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास रेल्वे अधिकाऱ्यांना कळवण्याचा किंवा मदतीसाठी १३९ डायल करण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

## ऊर्जा परिवर्तनातून राज्याच्या सामाजिक व आर्थिक क्षेत्राला बळ; महावितरणचा दोन पुरस्कारांनी सन्मान

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्याच्या सामाजिक व आर्थिक विकासामध्ये ऊर्जा परिवर्तनाद्वारे दिलेल्या विशेष योगदानाची दखल घेत महावितरणचा 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेसाठी रिन्यूएबल एनर्जी इनिशिएटिव्ह ऑफ द इयर तसेच प्राधान्य दराच्या वीजखरेदीमध्ये ६५ टक्के स्वस्त व शाश्वत अपारंपरिक ऊर्जेचा समावेश केल्याबद्दल क्लीन एनर्जी अँड रिन्यूएबल अडॉप्शन अवॉर्डने गौरविण्यात आले.



भविष्यातील सक्षम अर्थव्यवस्था घडविण्यासाठी इकॉनॉमिक टाइम्सने मुंबई येथे दोन दिवसीय महाराष्ट्र बिझनेस परिषदेचे आयोजन केले होते. त्यात शुक्रवारी (दि. २४) महावितरणचे कार्यकारी संचालक श्री. धनंजय औंढेकर, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी श्री. मंगेश कोहाट, तांत्रिक सहायक श्री. अमोल मोरे, माध्यम सल्लागार डॉ. दिनेश थिटे, सहायक अभियंता श्री. शुभम चोरमाळे यांनी हे पुरस्कार स्वीकारले.

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी रिसोर्स अ‍ॅडेक्सी प्लॅन तयार केला आहे. त्यानुसार सन २०३० पर्यंत तब्बल ३९ हजार ५०० हजार मेगावॅट हरित ऊर्जेची भर पडणार आहे. पर्यायाने राज्याची नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होणार आहे. या ऊर्जा परिवर्तनाला वेग देत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने प्राधान्य दरांवर अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांमध्ये आतापर्यंत ४७ हजार ३४७ मेगावॅट (६५ ट्क्के) वीज खरेदीचे दीर्घकालीन करार (पीपीए) केले आहेत. हरित ऊर्जेला प्राधान्य मिळाल्याने शेतकऱ्यांना दिवसा व स्वस्त वीज उपलब्ध होण्यास सुरवात झाली आहे. तर वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होत आहे. त्यामुळे प्रामुख्याने औद्योगिक व व्यावसायिक विजेचे दर स्वस्त होण्यास सुरवात झाली आहे. या कामगिरीसाठी महावितरणला क्लीन एनर्जी अँड रिन्यूएबल अडॉप्शन अवॉर्डने गौरविण्यात आले.

तसेच 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेद्वारे महाराष्ट्राने देशात अव्वल कामगिरी केली असून सर्वाधिक ९ लाख १७ हजार सौर पंप कार्यान्वित केले आहे. देशात सर्वाधिक ६४ टक्के सौर कृषिपंप महाराष्ट्रात कार्यान्वित झाले आहेत तर उर्वरित सर्व राज्यांमध्ये ५ लाख ५ हजार (३४ टक्के) सौर पंप कार्यान्वित झाले आहे. या योजनेतून केवळ ३० दिवसांत ४५ हजार ९११ सौर पंप कार्यान्वित करण्याच गिनिज वर्ल्ड रेकॉर्डने महावितरणला गौरविण्यात आले आहे. या योजनेतून सुमारे ४२ लाख एकर शेतजमिनीच्या सिंचनासाठी दिवसा व मोफत वीजपुरवठा सुरु झाला आहे. त्याची दखल घेत या योजनेसाठी महावितरणला रिन्यूएबल एनर्जी इनिशिएटिव्ह ऑफ द इयर पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## प्राण्यांच्या पाणपोईचे उद्घाटन

### पाणी जपून वापरा; बचत करा- जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड



**लातूर/प्रतिनिधी :** 'एल निनो' मुळे यावर्षी पाऊस कमी पडण्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. वाढते तापमान यामुळे पाण्याचा वापर अक्षरशः सोन्यासारखा करावा लागणार. पाणी पुनर्भरण, त्याची बचत काळाची गरज बनली आहे, असे आवाहन लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दै. भूकंपचे संपादक अशोक चिंचोले हे होते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्ताने गेल्या वर्षीपासून धनराज माने व त्यांच्या सहकारी मित्रांनी जिल्हाभरात मुक्या प्राण्यांसाठी ३०० पाणपोई चालू करण्याचा संकल्प सोडला. आज १५ पाणपोईचे उद्घाटन बामणी/भातांगळी येथे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या हस्ते करण्यात आले. आतापर्यंत ४७ पाणपोईचे पशू पाणी पित आहेत. या पाणपोईचे उद्घाटन सोहळ्यास जि. प. चे उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, लातूर शहर महानगरपालिका स्थाई समिती अध्यक्ष सचिन बंडापल्ले, लातूर पंचायत समिती सभापती श्रीकांत बैले, जि. प. सदस्य महादेव साळुंके, भातांगळी सरपंच परमेश्वर पाटील, उपसरपंच मारूती शिंदे, बामणीचे सरपंच भागवत दिवटे, उपसरपंच संजय ठाकूर आदिंची उपस्थिती होती.

बामणी येथे चालू करण्यात आलेल्या पाणपोईचे देणगीदार वैजनाथ दिवटे वत्यांच्या कुटुंबियांचा जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या हस्ते प्रातनिधीक स्वरूपात सत्कार करण्यात आला. वेगवेगळ्या देणगीदारांच्या मदतीतून अहिल्यादेवी होळकर ३०० व्या मुक्या प्राण्यांसाठी चालू असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी सुरवसे यांनी केले.

पाणपोईचे देणगीदार

आज एकच दिवस प्राण्यांसाठी १५ पाणपोईचा शुभारंभ करण्यात आला. भातांगळी येथील भातांगळी ग्रामस्थ राजकुमार मुरारी, रामचंद्र गोकुळे, राम बालवाड, गंगाधर बिराजदार, वामनराव पाटील, रामकिशन केदारी व बालाजी कारवाडे या भातांगळी येथील व निजाम मुजावर, वैजनाथ दिवटे, मारूती दिवटे, पंढरी दिवटे, विठ्ठल पोतदार या बामणी येथील देणगीदारांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास बालाजी सुरवसे, विष्णू कारवाडे, व्यंकटराव अंबुलगेकर, हरीभाऊ काळे, आदिनाथ मुळे, भागवत खंडापूर, शुभम देवकते, गंगाधर डोणे, विठ्ठल शेवाळे, गोरख कवितके, राहुल खेडेकर, नवनाथ गडदे, चंद्रकांत हजारे, प्रा. अशोक अभंगे आदिंची उपस्थिती होती.

# मध्य रेल्वे मुंबई/पुणे आणि गोरखपूर दरम्यान २४८ अतिरिक्त उन्हाळी विशेष गाड्या चालवणार

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वे मुंबई/पुणे ते गोरखपूर दरम्यान विशेष शुल्कावर २४८ अतिरिक्त उन्हाळी विशेष गाड्या चालवणार आहे.



तपशील खालीलप्रमाणे आहे: (१) छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई - गोरखपूर - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस दैनिक उन्हाळी विशेष गाड्या (१२४ सेवा) गाडी क्र. ०१०७९ विशेष गाडी दिनांक १५.०५.२०२६ ते दिनांक १५.०७.२०२६ पर्यंत दररोज छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून २२.३० वाजता सुटेल आणि गोरखपूर येथे तिसऱ्या दिवशी १०.०० वाजता पोहोचेल. (६२ सेवा) गाडी क्र. ०१०८० विशेष दिनांक १७.०५.२०२६ ते दिनांक १७.०७.२०२६ पर्यंत गोरखपूर येथून दररोज १४:३० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे तिसऱ्या दिवशी ००:४० वाजता पोहोचेल. (६२ सेवा)

थांबे: दादर, ठाणे, कल्याण, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, खंडवा, इटारसी, भोपाळ, बिना, वीरांगना लक्ष्मीबाई झाशी, ओरई, कानपूर सेंट्रल, लखनऊ, गोंडा, बस्ती आणि खलीलाबाद.

संरचना: १ वातानुकूलित द्वितीय, ६ वातानुकूलित तृतीय, ९ शयनयान, ४ सामान्य द्वितीय आणि २ सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड्स ब्रेक व्हॅन (२) पुणे - गोरखपूर - हडपसर दैनिक उन्हाळी विशेष गाड्या (१२४ सेवा) गाडी क्र. ०१४१५ विशेष गाडी दिनांक १५.०५.२०२६ ते दिनांक १५.०७.२०२६ पर्यंत दररोज सकाळी ०६.५० वाजता पुणे येथून सुटेल आणि गोरखपूर येथे दुसऱ्या दिवशी १६.०० वाजता पोहोचेल. (६२ सेवा) गाडी क्र. ०१४२६ विशेष गाडी दिनांक १६.०५.२०२६ ते दिनांक १६.०७.२०२६ पर्यंत गोरखपूर येथून दररोज १७.३० वाजता सुटेल आणि हडपसर येथे तिसऱ्या दिवशी ०३.१५ वाजता पोहोचेल. (६२ सेवा)

थांबे: दौंड कॉर्ड केबिन, अहिल्यानगर, कोपरगाव, मनमाड, भुसावळ, खंडवा, इटारसी, राणी कमलापती, बिना, वीरंगना लक्ष्मीबाई झाशी, ओरई, कानपूर सेंट्रल, लखनऊ, गोंडा आणि बस्ती.

संरचना: १ वातानुकूलित द्वितीय, ५ वातानुकूलित तृतीय, ६ शयनयान, ४ सामान्य द्वितीय आणि २ सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड्स ब्रेक व्हॅन

आरक्षण: विशेष गाडी क्रमांक ०१०७९ आणि गाडी क्रमांक ०१४१५ साठी विशेष शुल्कासह बुकिंग दिनांक २६.०४.२०२६ रोजी सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या संकेतस्थळावर सुरू होईल. अनारक्षित डब्यांसाठी सामान्य शुल्कासह बुकिंग यूटीएस (UTS) प्रणालीद्वारे करता येईल.

प्रवासी तिकीट बुकिंगसाठी रेलवन (RailOne) ॲप देखील डाउनलोड करू शकतात.

या विशेष गाड्यांच्या थांब्यांवरील सविस्तर वेळापत्रकासाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा.

## श्री गणेश सेवाभावी संस्थेच्या वतीने होतकरू विद्यार्थिनीस आर्थिक मदत


**लातूर/प्रतिनिधी :** वडिलांचे दुर्दैवी निधन झालेले असतानाही आपला बारावी परीक्षेचा गणित विषयाचा पेपर देऊन नेत्रदिपक यश संपादन केलेली अहमदपूर तालुक्यातील गुगदळ येथील विद्यार्थिनी कु. शिवानी महादेव देवकते हिला शैक्षणिक सहायता म्हणून श्री गणेश सेवाभावी संस्थेच्या वतीने २१ हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली.

ज्येष्ठ पत्रकार दीपरत्न निलंगेकर, श्रीधर स्वामी, ज्योतिष विशारद कौस्तुभ सुवर्णकार यांच्या हस्ते कु. शिवानीस ही मदत राशी प्रदान करण्यात आली. यावेळी श्री गणेश सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष निवृत्ती टाळे,संचालक बद्रीनाथ पिंपळडोहकर, कोषाध्यक्ष मरूप काझी, संतोष हल्लाळे, प्रमोद सुरवसे, रामानंद स्वामी, नवनाथ बाजगिरे यांचीही उपस्थिती होती.



निवृत्ती टाळे यांनी यावेळी बोलताना पित्याच्या निधनाचे दुःख बाजूला सारून शिक्षणाला प्राधान्य देण्याचे काम करणारी विद्यार्थिनी कु. शिवानी अतिशय हुशार आहे. तिने आतापासून पोलीस भरतीचीही तयारी सुरु केली आहे. भविष्यात एमपीएससीच्या माध्यमातून आणखी आपले उज्वल भवितव्य घडविण्याची तिची मानसिकता असल्याचे टाळे यांनी सांगितले. त्याचप्रमाणे शिवानीप्रमाणे होतकरू व हुशार विद्यार्थ्यांना मदत करण्याकामी आपली संस्था सदैव तयार असल्याचे नमूद केले. कु. शिवानी हिनेही आपण जीवनात यशस्वी होण्यासाठी कोणत्याही कष्टाचा सामना करण्याची तयारी ठेवल्याचे सांगितले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटिंग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतीच्या आधुनिकतेचा मंत्र दिला : डॉ. जयद्रथ जाधव

**लातूर/प्रतिनिधी :** शेती, सिंचन, उद्योग व ग्रामीण भागाच्या विकासासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका महत्त्वाची आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात आर्थिक विकास करताना त्यांनी शेती विकासाला प्राधान्य देऊन,शेतीचे आधुनिकीकरण व औद्योगिकरणाचा मंत्र त्यांनी दिला,असे विचार डॉ. जयद्रथ जाधव यांनी आपल्या भाषणातून मांडले.

चाकूर तालुक्यातील झरी बु. येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सार्वजनिक जयंती साजरी करण्यात आली. व्याख्यानाच्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शिवाजी सुगावकर तर विचारपीठावर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष श्री दयानंद सुरवसे, प्रा.वैजनाथ सुरनर,गोपीनाथ वाघमारे आणि प्रा. बालाजी कांबळे व स्वागताध्यक्ष प्रभू कांबळे, कुमार कांबळे उपस्थित होते.

यावेळी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, प्रा. वैजनाथ सुरनर, गोपीनाथ वाघमारे, शिवाजी सुगावकर यांची भाषण झाली. प्रा.वैजनाथ सुरनर यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन संघर्षाचा परिचय करून दिला.आंबेडकर हे भारतीय समाजाचे उद्धारक होते.सर्वसामान्य दीन, दलित, शोषित व पीडित समाजाला सन्मानाने जगण्याचा हक्क मिळवून दिला. सर्वांना मतदानाचा हक्क देऊन समाता प्रस्थापित केली.ते अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, धर्मशास्त्राचे गाढे अभ्यासक होते. दी प्राबलम्स ऑफ रूपी हा ग्रंथ म्हणजे आंबेडकरांच्या जागतिक ज्ञानाचा सन्मान आहे.

डॉ.जयद्रथ जाधव आपल्या भाषणात पुढे म्हणाले की,'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी धोरण' या विषयाची मांडणी करताना ते म्हणाले की, देशाची अर्थव्यवस्था व आर्थिक विकास शेतीवर अवलंबून आहे. म्हणून शेतीकडे पोटापाण्यापुरता व्यवसाय म्हणून न पाहता शेतीचे आधुनिकीकरण करून शेतीचे उत्पन्न वाढविले पाहिजे. लहान शेतकऱ्यांच्या समस्या या निबंधात ते शेतीच्या लहान तुकड्याच्या विभाजनाला विरोध करतात. शेतीवरील लोकसंख्येचा बोजा कमी करून तो व्यवसाय, व्यापार आणि औद्योगीकरणाकडे वळविला पाहिजे, आणि माणसांच्या क्रयशक्तीला वाव देऊन देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ केली पाहिजे. यावेळी सहकारी शेती, शेतसारा पद्धती, सिंचनाच्या सोयी सुविधा,यावरही त्यांनी आपल्या भाषणातून प्रकाश टाकला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी संवैधानिक लढा देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पहिले नेते होते. कोकणातील खोती पद्धत पूर्णतः नष्ट करण्याचे काम त्यांनी केले आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गोपिनाथ वाघमारे यांनी केले तर आभार कुमार कांबळे यांनी मानले.राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.




## हिवताप निर्मूलनासाठी प्रत्येकाने काळजी घ्यावी, डासोउत्पत्ती थांबवा - डॉ. शरद कुमार तेलगाण

**उदगीर/प्रतिनिधी :** सध्या हिवताप निर्मूलन करणे गरजेचे आहे. राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत हिवताप या आजाराचा प्रादुर्भाव टाळणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रथम डास उत्पन्न होणार नाहीत याची काळजी घ्यावी, कारण हिवताप या आजाराचा प्रादुर्भाव डासापासून होतो जागतिक स्तरावर गेल्या काही दशकापासून सुई तापावर मात करण्यासाठी सर्व स्तरावरून प्रयत्न सुरू केले गेले आहेत त्याची आठवण म्हणून जागतिक हिवताप दिन २५ एप्रिल रोजी साजरा केला जातो.

मात्र एक दिवस पाळून चालणार नाही, आपल्या परिसराची स्वच्छता आणि दास ज्या ठिकाणाहून निर्माण होतात ती डबके किंवा साचलेल्या पाण्याचे साठे स्वच्छ केले पाहिजेत, शासकीय पातळीवरून हिवतापावर मात करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत सरकारी यंत्रणेच्या प्रयत्नांबरोबरच जनतेचा सहभाग फार महत्त्वाचा आहे इतर सरकारी यंत्रणेचे सहकार्य ही तितकेच महत्त्वाचे आहेत असे विचार उदगीर येथील ओम हॉस्पिटल व मॅटर्निटी होम ते संचालक तथा समाज प्रबोधनात्मक कीर्तनकार ह भ प स्त्री रग तज्ज्ञ डॉ. शरदकुमार तेलगाने यांनी मांडले आहे.

# आठवणी तीन पिढ्यांच्या हे पोलादी पुरुषाचे कथन

## सुप्रसिद्ध साहित्यिक जी. के. ऐनापुरे यांचे प्रतिपादन

**लातूर/प्रतिनिधी :** शिवाजी शंकरराव उमाटे लिखित आठवणी तीन पिढ्यांच्या हे एका पोलादी पुरुषाचे कथन आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक तथा समीक्षक जी. के. ऐनापुरे यांनी केले. ते या आत्मकथनाच्या समारंभात मुख्य वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ सोमनाथ रोडे सर हे होते सुप्रसिद्ध साहित्यिक व मेंदूविकार तज्ज्ञ डॉ. निलेश नागरगोजे यांच्या हस्ते व प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, माधवराव बरगे, शिवाजीराव उमाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.




यावेळी बोलताना जी.के.ऐनापूरे म्हणाले की हा केवळ एका घराण्याच्या आठवणी नसून या सीमावर्ती भागातील सबंध समाज व्यवहाराच्या, समाज संस्कृतीच्या सामाजिक सांस्कृतिक जगण्याचा इतिहास आहे. स्मृती ह्या महत्वाच्या आहेत. असे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी बोलताना डॉ. निलेश नागरगोजे यांनी हे कथन अत्यंत प्रभावीपणे साकारले असून आगामी काळात याचे महत्त्व संदर्भ म्हणून अधोरेखित होईल असे मत मांडले.

या पुस्तकावर शुभेच्छापर बोलताना प्राचार्य नागोराव कुंभार सर, श्री. माधवराव बरगे यांनीही पुस्तकातील मांडणी अत्यंत प्रभावी व तपशीलवार केली असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप माजी प्राचार्य सोमनाथ रोडे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाऊसाहेब उमाटे, सूत्रसंचलन सतीश हानेगावे या आभार प्रदर्शन डॉ. अनिल जायभाये यांनी मानले. सदर कार्यक्रमास लातूरसह देवणी, वलांडी व अनंतवाडी परिसरातील नागरिक, जाणकार वाचक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## अहमदपूर तालुक्यात शिष्यवृत्ती परीक्षेस ४ थी २५०४ तर ७ वी साठी २०१३ विद्यार्थी परीक्षा देणार

**अहमदपूर/प्रतिनिधी :** : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे (चडउए) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी इयत्ता चौथी (प्राथमिक) व सातवी (उच्च प्राथमिक) शिष्यवृत्ती परीक्षा आज, दि. २६ एप्रिल २०२६ रोजी राज्यभर एकाच दिवशी शांततेत व सुरळीत पार पडत आहे.

या परीक्षेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून अहमदपूर तालुक्यात इयत्ता चौथीसाठी एकूण १३ परीक्षा केंद्रांवर २५०४ विद्यार्थी परीक्षेला बसले आहेत. तर इयत्ता सातवीसाठी ११ परीक्षा केंद्रांवर २०१३ विद्यार्थी परीक्षा देत आहेत, अशी माहिती गटशिक्षणाधिकारी रामलिंग काळे यांनी दिली. शासन निर्णयानुसार, इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना प्रतिमाह ५०० रुपये प्रमाणे दरवर्षी ५,००० रुपये शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली आहे. तर इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रतिमाह ७५० रुपये प्रमाणे दरवर्षी ७,५०० रुपये शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. दोन्ही शिष्यवृत्तींचा कालावधी प्रत्येकी तीन वर्षांचा राहणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. ही शिष्यवृत्ती परीक्षा विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासास चालना देणारी असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी विशेषतः उपयुक्त ठरत आहे. परीक्षा केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून प्रशासनाने परीक्षेचे नियोजन व्यवस्थित केले आहे.

टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

# सिंगल युज प्लास्टिक बंदी बाबत ५६ आस्थापनांवर मनपाची कारवाई

## २५ किलो प्लास्टिक जप्त बत्तीस हजार दंड वसूल





**लातूर/प्रतिनिधी :** दि.२३ व २४ एप्रिल रोजी महापौर जयश्रीताई सोनकांबळे, आयुक्त श्रीमती मानसी (भा.प्र.से) यांचे निर्देशानुसार उपायुक्त, वसुधा फड यांच्या मार्गदर्शनाखाली राजीव गांधी चौक, विवेकानंद चौक,कव्हा नाका,गांधी चौक, बार्शी रोड, औसा रोड, गंज गोलाई भागात सिंगल युज प्लास्टीकवर कार्यवाही करण्यात आली.

सदर कार्यवाही दरम्यान ५६ आस्थापनांवर दंडात्मक कार्यवाही करून २५ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आला असून रू.बत्तीस हजार चारशे रूपयेची दंडात्मक कार्यवाही करण्यात आली सदर कार्यवाही दरम्यान मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, प्रमुख स्वच्छता निरीक्षक अक्रम शेख, शिवराज शिंदे,डि. एस सोनवणे, रवी कांबळे तसेच सर्व स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते. ही मोहीम अशीच सुरू राहणार असून शहरातील व्यवसायीकांनी व नागरिकांनी प्लास्टिक कॅरीबग वापर टाळून कापडी बॅगचा वापर करावा व पर्यावरण संवर्धनास हातभार लावावा असे आवाहन उपायुक्त वसुधा फड यांनी केले आहे.

### रिमोट ..

निर्णय न मना जोगा
तपास यंत्रणेत खोटं
कुठे तरी पाणी मुरते
उठले अफवांचे लोट

रस्ते सगळे वक्राकार
काही नसे सरळसोट
संशय कल्लोळ माते
मुक्तते उधाळलीनोट

मौन बाळगू लागलेत
बंदिस्तबोलणारेओठ
अ सह्य होते उचंबळ
असूयेनी दुखले पोट

निर्णय प्रक्रिया क्लिष्ट
कधी होतोयं कडेलोट
वाटा पळवाटा निघते
हो बंदोबस्त कडेकोट

असूद्या काही निकाल
बांधायची नव्यानेमोट
ठरलेले पहावे लागेलं
दुजांच्याहातात रिमोट

तेहीपाहती हतबध्दते
ज्यांचे हाती बँकव्होट
नाम मात्र रे महत्वाचे
शाई वाळलेले ते बोट

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६

# अहमदपुरात जुगार खेळणाऱ्यांवर पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाची धाड

## १६ आरोपींविरुद्ध कारवाई, सहा लाखांचा मुद्देमाल जप्त

**अहमदपूर/प्रतिनिधी :** अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी नांदेड परिक्षेत्रात कार्यरत विशेष पथकास अहमदपूर, जि. लातूर येथे एका बारच्या दुसऱ्या मजल्यावर जुगार सुरू असल्याची माहिती प्राप्त झाली होती.

सदर माहितीवरून, दिनांक २५/०४/२०२६ रोजी, पथकाने अहमदपूर तालुक्यातील, मौजे काजळ हिप्परगा येथील विसावा बारच्या दुसऱ्या मजल्यावर छापा टाकला असता, सदर ठिकाणी तिर्रट नावाचा जुगार खेळताना (१६) इसम मिळून आले. सदर इसमांना ताब्यात घेऊन, त्यांच्याकडून १,४४,७५०/- रुपयांची रोकड, १,०३,०००/- रुपयांचे (१४) मोबाईल व ३,४०,०००/- रुपयांच्या (६) मोटार सायकली असा एकूण ५,८७,७५०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, त्यांचेविरुध्द अहमदपुर पोलीस ठाणे येथे गुरनं २३३/२०२६ कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार कायद्याअन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास अहमदपुर पोलीस ठाण्यातील मपोउपनि स्मिता जाधव यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.



सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/संजीव जिंकलवाड, पोकॉ/ गणेश धुमाळ व पोकॉ/ कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन करून त्यांना प्रोत्साहित केले आहे.

'खबर' हेल्पलाइन वरून माहिती द्या : परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, नागरिकांनी आपल्या भागात चालणाऱ्या अवैध व्यवसायांची माहिती ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेल्या 'खबर' या हेल्पलाइन वर फोन करून अथवा व्हाट्सअप मेसेज द्वारे द्यावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी केले आहे.

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६